₹ १०/-

संत निरंकारी (मराठी)

वर्ष १८वे अंक ४था एप्रिल २०१२



गन्नौर-समालखाच्या मध्ये स्थित, संत निरंकारी आध्यात्मिक स्थळावर आयोजित हरियाणाच्या प्रांतीक संत समागमात सद्‌गुरु बाबाजींच्या सान्निध्यात आपले भाव प्रकट करताना स्थानिक बहिणी

हरियाणाच्या प्रांतीय संत समागमात सेवादल रॅलीचे निरीक्षण करताना सद्‌गुरु बाबाजी, सोबत आहे मातृशक्ती

वारसा (महाराष्ट्र)त सद्‌गुरु बाबाजींचं आत्मिक स्वागत करताना श्रध्दाळू भाऊ-बहिणी

संत निरंकारी

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी नियतकालिक)

वर्ष १८वे | अंक ४ था | एप्रिल २०१२ | पाने - ४०

❋ संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव ❋ सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर

अनुक्रमणिका

संपादकीय	.....	संपादक	.....	२
श्रीगुरुवचनामृत	.....	श्रीसद्गुरुदेव	.....	१७
म्हणे अवतार	.....	श्री. स. वि. लव्हटे	.....	३
युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी...	.....	श्री.जगन्नाथ चै. मडकर	.....	५
मातृवचनामृत	.....	निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी....		१२
स्त्री जीवनाचे कर्तव्य	.....	सौ. आशा सि. गायकवाड	.....	१३
विवेक विचारधारेचा अनमोल खजिना	.....	सौ. सरीता न. तळवडेकर	.....	१५
मानव एकता	.....	कु. सोनाली गु. चव्हाण	.....	२५
जेव्हा तोंड उघडू तेव्हा गोडच बोलू (अनुभवाचे बोल)		श्री. विकास अरोरा	.....	२६
जीवनात असावी गुरुमर्यादा	.....	श्री. जे. एस्. देवरे	.....	२८
जीवनमुक्ती	.....	कु. महेंद्र प्र. माने	.....	२९
देवाचिये द्वारी उभा क्षणभरी....	.....	सौ. सरस्वती सु. नांदोडे	.....	३२
सत्संगाचे संस्कार	.....	श्री. भरतबुवा रामदासी	.....	३३
तिसरा प्रण ... आहार	.....	श्री. प्रवीण तु. रेडेकर	.....	३५
दुःख मूळ संसार	.....	श्री. कोंडाजी भा. निरंकारी	.....	३६
मन काबूत कसं ठेवायचं?	.....	कु. स्वाती बा. उमाप	.....	३९

गीत/कविता

मानवाला मानव प्रिय असावा, ...	.....	श्री. बाळकृष्ण ज. कासार	.....	३०
जिथे मानवता वसे	.....	श्री. दिलीप मोरे	.....	३१

लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	₹ ८०/-	₹ ८००/-
इंग्लंड	£ 12	£ 150
युरोप	€ 15	€ 200
अमेरिका	$ 20	$ 250
कॅनडा	$ 25	$ 300

प्रति अंक रु. १०/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता
पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन : २४१० ५७ ४९
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक : संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक प्रॉसेस्ड प्रिंटींग प्रेस, कुलकर्णी कॉटेज, गोखले क्रॉस रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८, येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

संपादकीय

जगप्रसिध्द तत्वज्ञानी ॲरिस्टॉटल यांनी म्हटले आहे... लढवय्या सैनिक कधीही संधीची वाट बघत नाही. तो संधी निर्माण करत असतो. तो नेहमी प्राण असेपर्यंत झुंज देत असतो. समर्पण, मेहनत, जिद्द आणि स्वत:वरील प्रचंड विश्वास त्याला विजयाची दारे खुली करुन देतो. आपले प्राण आणि भविष्य शत्रूच्या तलवारीत नव्हे, तर आपल्याच मनगटाच्या शक्तीवर अवलंबून असल्याची जाणीव त्याला असते. तो आपल्या पराभवाचे खापर दुसऱ्यावर फोडत नाही. तो अखेरपर्यंत लढत असतो म्हणूनच तो 'लढवय्या' असतो.

युगानुयुगे या धरतीवर अशा लढवय्या व्यक्तिमत्वाच्या महान विभूती होऊन गेल्या, ज्यांनी कोणतेही शस्त्र हाती न घेता फक्त आपल्या कर्मयोगाने मानवसमाजाच्या उध्दाराचे प्रचंड कार्य केले. चंदनासारखे स्वत: सुगंधित असूनही त्याचा स्वत: लाभ न घेता चंदनासारखे झिजून दुसऱ्यांचे जीवन सुगंधित केले. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या मानवमात्राला ज्ञानप्रकाश दाखविण्यासाठी मानवतेचे दीपस्तंभ बनले. अशा या महान विभूतींच्या जीवनकाळात धर्मांध आणि पाखंडी लोकांनी त्यांचा अमानुष छळ केला. सकल जगाला प्रेम आणि माणुसकीची शिकवण देणाऱ्या देवदूत येशू ख्रिस्ताच्या हाता-पायाला खिळे ठोकून त्यांना सुळावर लटकावणे म्हणजे मानवतेच्या इतिहासाला काळिमा फासणारी अत्यंत क्रूर आणि दुर्दैवी घटना. हजारो वर्षे उलटून गेल्यानंतरही अशीच एक घडलेली क्रूर आणि पाशवी घटना.... अज्ञान आणि अंधश्रध्देच्या पाखंडवादातून मानवी जीवाला मुक्त करुन ब्रह्मज्ञानाच्या तेजोमय ज्ञानप्रकाशात मानवी जीवन सुखमय करणाऱ्या युगप्रवर्तक सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांची धार्मिक दहशतवाद्यांनी २४ एप्रिल १९८० मध्ये गोळ्यांच्या वर्षावात हत्या केली आणि पुन्हा आध्यात्मिक इतिहासाचं आणखी एक पान काळंकुट्ट झालं.

अंधश्रध्दा आणि अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या मानवमात्राला सत्य आणि शाश्वत प्रकाशाचा मार्ग दाखवणाऱ्या भगवान येशू ख्रिस्त आणि युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी यांना मानवमात्राच्या कल्याण आणि उध्दारासाठी आपल्या प्राणांचं बलिदान द्यावं लागलं. आपल्या परमतत्वासाठी त्यांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या तरीही पाखंडी आणि धार्मिक दहशतवादाविरुध्द अहिंसक मार्गाने अखेरपर्यंत लढत दिली म्हणून इतिहासाच्या पानावर या विभूती लढवय्या महामानव म्हणून अजरामर ठरल्या. बलिदानाच्या वेदीवर या लढवय्या महामानवांना आपल्या देहाची आहुती द्यावी लागली तरीही येशू ख्रिस्तांची प्रेमाची शिकवण, तत्व आणि विचार आजही जगात अजरामर झाले आहेत, तर बाबा गुरबचनसिंहजींच्या प्राणार्पणाने निरंकारी मिशन संपण्याऐवजी आज विश्वव्यापी मिशन बनले आहे. युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजींच्या मानवता, मानव एकता, विश्वशांती, विश्वबंधुत्व या अलौकिक ध्येयांची महानता अत्याचार आणि हिंसेच्या ज्वालाग्नित होरपळून निघणाऱ्या सकल विश्वातील मानवसमाजाला पटू लागली आहे.

युगप्रवर्तक आपलं जीवन जगले ते मानवतेसाठी आणि प्राणार्पण केले तेही मानवतेसाठीच. आजही मानवतेचा हा क्रांतीसूर्य युगद्रष्टा सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या रुपात मानवतेची तेजस्वी किरणं सकल विश्वात पसरवत आहे.

□ *चंद्रकांत जाधव*
snm.jadhavca@gmail.com

भाग-३०

|| म्हणे अवतार... ||

मूळ अवतारवाणी

अनगिणत ही नाम ने तेरे अनगिणत अस्थान वी ने।
जित्थे सोचां पहुंच न सक्कण लक्खां होर जहान वी ने।
संख करोड़ां कह के तैनूं ऐवें भार उठाणा ए।
हेराफेरी अक्खरां दी अक्खरां दा ताणा बाणा ए।
अक्खरां दी ही खेड है सारी गीत गुणां दे गांदे ने।
अक्खरां दे ही बोल बणे ने लिक्खे बोले जांदे ने।
लक्खां होणगे दाते भावें गुर वरगा कोई दाता नहीं।
कहे अवतार बिना गुर पूरे अज तक किसे पछाता नहीं। (पद क्र.२३)

मराठी अनुवाद

असंख्य असूनी तुझी ठिकाणे शत कोटी नामे तुजला।
मन बुध्दीही जिथे न पोहचे ऐसी जगती तव लीला।
नाना रीती तुला आळवूनी व्यर्थच भार असे घेणे।
शब्दांची ही हेरा फेरी फिरवा फिरवी उगा करणे।
खेळ अक्षरी आहे सारा गुणवंतांचे गुण गाती।
अक्षरातूनी बोल जाहले लिहिले अन् वदले जाती।
देणारे लाखो या जगती दाता नाही गुरु समान।
आजवरी अवतार गुरुवीण कुणा न झाले याचे ज्ञान। (पद क्र.२३)

अनंत परमेश्वराला संख्येमध्ये बांधणे म्हणजे काजव्याला सूर्याची उपमा देण्यासारखेच होईल. सृष्टीरचनेतील विस्मयकारक अद्‌भुतपणा पाहिला म्हणजे माणसाची बुध्दी कुंठीत झाल्याशिवाय रहात नाही. वेदांमध्ये म्हटले गेले आहे की,

एको देव सर्वभूतेषु गूढः। सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा। कर्माध्यक्षः साक्षी चेतः केवलो निर्गुणस्य।

अर्थात, एकच परमेश्वर समस्त भूतमात्रांमध्ये अत्यंत गूढरीतीने सामावला आहे. तो सर्वव्यापी असून सर्वांचा अंतरात्मा आहे. सर्व कर्मांचा तो अध्यक्ष आहे. अर्थात तोच कर्ता-करविता आहे. प्रत्येक

गोष्टीला तो साक्षीरुप आहे. तो चैतन्यस्वरुप असून कैवल्यमय म्हणजेच मुक्तीप्रद आहे आणि तो निर्गुण म्हणजेच गुणातीत आहे.

शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज यांनी संपूर्ण अवतार वाणीच्या उपरोक्त पदामध्ये हीच भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. ते म्हणत आहेत की, हे प्रभू तुझी मंदिरे असंख्य असून तुझी नामंही कोट्यावधी म्हणजेच अनंत आहेत. तुझी लीला अपरंपार आहे. तिथे मन आणि बुध्दीचे सामर्थ्य तोकडे पडते. तुझ्या स्तुती गायनासाठी कितीही उच्च कोटीतील शब्द योजले तरीही तुझे कीर्तिगायन अपुरेच राहते. तेव्हा ही शब्दांची हेराफेरी करण्यात काय हशील आहे? अक्षर म्हणजेच अक्षय-अविनाशी अशा परमात्म्याचाच हा सगळा खेळ आहे आणि या गुणांच्या स्वामीचेच गुण गुणीजनांनी गायले आहेत. अक्षराचा दुसरा अर्थ मुळाक्षरे असाही होतो. या मूळ अक्षरांपासूनच शब्द बनले आहेत, जे लिहिले आणि बोलले जात आहेत. तसे पाहिले तर जगामध्ये अनेक दानशूर लोक आहेत. परंतु सद्गुरुची सर कोणालाच येणार नाही. जगाचा अगणित पसारा रचणाऱ्या प्रभूचे गूढसद्गुरु कृपेनेच उकलते. सद्गुरुच अक्षर अशा परमात्म्याचे दान आमच्या पदरात टाकतो म्हणूनच तो सर्वश्रेष्ठ दानी होय.

जिथपर्यंत भगवंताच्या मंदिरांचा प्रश्न आहे त्याविषयी समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधातील या ओळी आठवल्याशिवाय रहात नाहीत की,

पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे। तितुकी भगवंताची घरे। नाना सुखे येणे द्वारे। प्राप्त होती

किंवा

देव पाहावयाकारणे। देऊळे लागती पाहणे। कोठे तरी देऊळाच्या गुणे। देव प्रगटे।
देऊळे म्हणिजे नाना शरीरे। तेथे राहिजे जीवेश्वरे। नाना शरीरे नाना प्रकारे। अनंत भेदे।
चालती बोलती देऊळे तयामध्ये राहिजे राऊळे। जितुकी देऊळे तितुकी सकळे। कळली पाहिजे।

समर्थांनी देव आणि देऊळे यांचे केलेले हे वर्णन शहनशाहजींच्या उपरोक्त पदाची पुष्टी करीत आहे. शहनशाहजींनी या पदामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, हा अनंत परमात्मा मन-बुध्दीच्या पलीकडे असून त्याला प्राप्त करण्याचे एकमेव साधन म्हणजे समर्थ सद्गुरुला शरण जाणे होय. त्याच्या प्राप्ती शिवाय शब्दांनी त्याची स्तुती गाणे निरर्थक आहे. म्हणून भगवंताचे गुणानुवर्णन करु इच्छिणाऱ्यांनी सद्गुरुदेवांच्या चरणी येऊन त्याचे प्रथम ज्ञान प्राप्त करणे जरुरीचे आहे.

क्रमशः

- श्री. स. वि. लव्हटे
जुईनगर, नवी मुंबई

युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी.... एक मिशन

सन १९३०! भारतीय इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण वर्ष. देशात स्वातंत्र्याच्या आंदोलनाने पराकाष्ठेची सीमा ओलांडली होती. देशभक्त गुलामगिरीच्या बेडीतून देशाला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीच्या अग्निकुंडात आपल्या प्राणांची आहुती देत होते. त्याच वेळी रुढिवादी आणि अज्ञानतेच्या बिकट बंधनात बंदिस्त झालेल्या मानवसमाजाला मुक्त करण्यासाठी जगतविधात्या निराकार प्रभू परमात्म्याने एका अशा दैवी शिशूला जन्म दिला, ज्याने पुढील काळात वादळी झंझावाताप्रमाणे परंपरागत रुढिवादाचा केरकचरा नष्ट करुन टाकला आणि अशी एक दिव्य ज्ञानज्योत प्रज्वलित करुन तिच्या दिव्य ज्ञानप्रकाशात अज्ञानतेच्या अंधःकाराला शेवटचा श्वास घ्यायला भाग पाडले. शतकानुशतके भ्रमांच्या जाळ्यात बंदिवान झालेली मानवता मुक्त झाली आणि लाखो लोकांनी सुखाचा श्वास घेतला.

त्या दैवी शिशूचं नाव होतं बाबा गुरबचनसिंहजी! पेशावर येथे बाबा अवतारसिंहजींच्या घरी आणि बुध्दवंती कौरजींच्या उदरी गुरबचनसिंहजींचा १० डिसेंबर १९३० मध्ये जन्म झाला. त्यावेळी निरंकारी मिशनचे आद्यप्रणेते सद्गुरु बाबा बूटासिंहजी यांचं अवतारसिंहजींच्या घरी वास्तव्य होतं. त्यामुळे आपल्या आई–वडिलांच्या लाड-कौतुकाबरोबर सद्गुरुचं दिव्य प्रेम आणि आशीर्वाद गुरबचनसिंहजी यांना बालपणीच प्राप्त झाले. इतर मुलांमध्ये बालपणी जे विशेष गुण दिसून येत नाहीत असे गुण आई-वडील आणि सद्गुरुच्या संस्कारामुळे गुरबचनसिंहजींमध्ये दिसून आले. दुसऱ्यांच्या दुःख-वेदना पाहून हृदय विरघळणे, त्यांना शक्यतो सर्वप्रकारे मदत करणे, लढाई-भांडणांपासून दूर राहणे, दुसऱ्यांच्या गुणांची प्रशंसा करणे, ईर्ष्या-द्वेष-निंदा-चुगली पासून वाचवणे इत्यादी सद्गुण गुरबचनसिंहजींच्या अंगी प्रगट होऊ लागले होते. त्यांच्या बालपणीची अशीच एक घटना. एकदा शाळेतून सुटल्याबरोबर ते आपल्या वडिलांच्या दुकानावर गेले. त्यांच्याबरोबर दोन-तीन बालमित्रही होते. त्यावेळी नेहमीप्रमाणे अवतारसिंहजींनी त्यांना खर्चासाठी पैसे (Pocket- Money) दिले. माझ्या मित्रांनाही असेच खर्चासाठी पैसे द्यावेत असा त्यांनी वडिलांना आग्रह केला. यावरुन सिध्द होतं की, गुरबचनसिंहजीं जवळ आपला-परका हा भेदभावच नव्हता. काही वेळा ते जेवायला बसत तेव्हा त्यांचा भोळा स्वभाव पाहून त्यांचे सवंगडी त्यांच्या समोरील सर्व चांगले पदार्थ पटापट खाऊन टाकत आणि काही वेळा गुरबचनसिंहजींना उपाशीपोटीच रहावं लागत असे. जेव्हा त्यांची आई त्यांना विचारायची तेव्हा कोणतीही तक्रार न करता हसून उत्तर देत की, मी सुध्दा खूप खाल्लं आहे. कोणाचीही तक्रार करणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. एका साधारण मुलाप्रमाणे ते कधीही कोणत्या वस्तूची मागणी करत नसत. उलट काही वेळा स्वतःजवळच्या वस्तू आपल्या मित्रांना देऊन त्यांच्या आनंदात सहभागी होत असत. अभ्यासात ते फारच हुशार होते. सुरुवातीचं शिक्षण पेशावरमध्ये आणि मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण त्यांनी

रावळपिंडीच्या खालसा शाळेतून घेतलं. १९४७ साली भारताची फाळणी झाल्यानंतर जी उलथापालथ झाली त्यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही, परंतु आपल्या विवेक आणि बुध्दीच्या जोरावर त्यांनी जितके गहन अनुभव प्राप्त केले त्याचं उदाहरण सापडणं कठीण आहे. ते विचार अधिक करत, पण बोलणं मात्र कमी होतं. म्हणून कदाचित काही करणे किंवा बोलण्या अगोदर वातावरण आणि परिस्थितीचा पूर्णपणे अभ्यास करणे हा महान व्यक्तिंचा गुणधर्म आहे.

सन १९४७ हे भारतासाठी अत्यंत दुर्दैवी वर्ष होते, कारण याच वर्षात देशाची फाळणी झाली. या फाळणीपूर्वी काही महिने अगोदर म्हणजे २२ एप्रिल १९४७ मध्ये गुरबचनसिंहजींचा विवाह कुलवंत कौरजींबरोबर झाला. जीवनाच्या प्रत्येक वळणावर गुरबचनसिंहजींच्या खांद्याला खांदा लावून आणि पावलावर पाऊल टाकून एक मर्यादाशील पत्नी आणि एक आदर्श जीवनसोबती म्हणून कुलवंत कौरजी सिध्द ठरल्या. सांगायचं झाल्यास मानवकल्याणासाठीच निराकार प्रभूनं ही जोडी निश्चित केली होती. १९४७ च्या धुमाळीत अनेक वर्षानुवर्षांचे पारस्परिक संबंध तोडून, घरादाराचा त्याग करुन लोकांना भारतात स्थलांतर करावं लागत होतं, त्यात निरंकारी अनुयायींचा देखील समावेश होता. आपापल्या देशात जाता यावं म्हणून सरकारतर्फे शरणार्थी शिबिरांची व्यवस्था करण्यात आली होती. रावळपिंडी येथील 'वाह' शरणार्थी शिबिरात बाबा अवतारसिंहजींनी आपल्या कुटुंबासह निरंकारी संत-महात्म्यांना दाखल केले होते. दूषित वातावरण पाहून बाबा अवतारसिंहजी नाईलाजाने भारतात दिल्लीला दाखल झाले. 'वाह' शरणार्थी शिबिरातील शरणार्थींच्या सेवेची जबाबदारी बाबा गुरबचनसिंहजींनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. शरणार्थी शिबिरात ते स्वतः अन्न-धान्याचं वाटप करत. भारतात जाण्यासाठी जेव्हा गाडयांची व्यवस्था करण्यात आली तेव्हा आपापल्या सामानासह सर्वच प्रवासी जाऊ शकत नव्हते म्हणून ''आपण आपापलं सामान इथे सोडून भारतात दाखल व्हा. आपलं सर्व सामान मी स्वतः मागाहून घेऊन येईन'' असं गुरबचनसिंहजींनी निर्धारपूर्वक सांगितले. सर्वांना मोठे आश्चर्य वाटले की, स्वतःच्या नवविवाहित पत्नीला भारतात पाठवून अशा महाभयानक परिस्थितीत इतरांच्या सामानाच्या संरक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेऊन इथे थांबू इच्छितोय. काही दिवसानंतर सर्वांचं सामान एका मालगाडीत लादून ते भारतात आले. काही दिवस जालंधरला वास्तव्य केल्यानंतर दिल्लीला आपले वडील बाबा अवतारसिंहजींच्या चरणी रुजू झाले.

भारतात आल्यानंतर सद्गुरु बाबा अवतारसिंहजी महाराजांनी प्रचार-प्रसार कार्याला अखंड वाहून घेतले. सत्संगही वेगाने वाढू लागले. प्रश्न होता तो उदरनिर्वाहाचा ? कारण सर्वस्वाचा त्याग करुन भारतात यावं लागलं होतं. बाबा अवतारसिंहजींच्या प्रचार-प्रसार कार्यात उदरनिर्वाहाचा कोणताही अडथळा येऊ नये म्हणून सर्व कौटुंबिक जबाबदारी गुरबचनसिंहजींनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. नवीन शहर, अनोळखी लोक, आर्थिक टंचाई अशी समस्या समोर उभी होती. या समस्येवर मात करण्यासाठी त्यांनी मोटर-पार्टस् विक्रीचा व्यवसाय सुरु केला. रावळपिंडीत (पाकिस्तान) इयत्ता आठवीत शिकत असताना मोटर-पार्टसच्या कामाचे त्यांनी प्रशिक्षण घेतले होते, शिवाय संबंधित महात्म्यांच्या दुकानात जाऊन कामही करत. त्यामुळे मोटर पार्टसचा त्यांना चांगला अनुभव होता. थोड्याशा भांडवलात मोटर-पार्टस् खरेदी-विक्रीचा व्यवसाय त्यांनी सुरु केला. एका दुकानात सामान खरेदी करत आणि सायकलवर लादून दूर-दूर जाऊन इतर दुकानात सामानाची विक्री करत. ऊन-पाऊस-थंडीची पर्वा न करता सायकलवर बसून एका दुकानातून दुसऱ्या दुकानात, एका बाजारातून दुसऱ्या बाजारात मोटर पार्टस्ची विक्री करणाऱ्या या तरुणाबद्दल त्यावेळी कोणी विचार केला होता का की, हाच तरुण एके दिवशी लाखो हृदयांचा सम्राट होईल आणि लाखो लोकांना खोट्या मान-मर्यादेच्या बेडीतून सोडवून कर्म क्षेत्रात उतरण्याची प्रेरणा देईल. परिश्रमाचं गोड फळ मिळालं आणि दिल्लीच्या मोरी गेटजवळ स्वतःचं दुकान उघडलं. गोड बोलणं, विनम्रता, प्रामाणिकपणामुळे ग्राहकांची संख्या वाढू लागली आणि एका दुकानाची चार दुकानं झाली. जालंधर येथेही दुकान उघडले आणि बाबा अवतारसिंहजींच्या आज्ञेनुसार जालंधरला राहून दुकान चालवू लागले. आपल्या व्यवसायात काही महापुरुषांना भागीदार बनवले आणि

काही महापुरुषांना दुकानात कामाला ठेवले जेणेकरुन एका कामामुळे अनेकांचा उदरनिर्वाह चालू शकेल.

१९५९ मध्ये बाबा गुरबचनसिंहजी जालंधरहून दिल्लीला पुन्हा परतले आणि आणखी एक मोटर पार्टस्‌चे नवीन दुकान उघडले. अशाप्रकारे दिल्लीत राहून ते आपल्या आई-वडिलांची सेवा करु लागले. अर्थात बाबा अवतारसिंहजींना वडिलांपेक्षा सद्‌गुरु रुपात अधिक मानून विनयपूर्वक दास्य भावनेने त्यांची सेवा केली. सद्‌गुरुची सेवा करणे हेच त्यांच्या जीवनाचे मुख्य ध्येय बनले होते. दुकानाच्या व्यवसायातून सवड काढून आपला जास्तीत जास्त वेळ सद्‌गुरुच्या सेवेत व्यतीत करत. सद्‌गुरुची गाडी चालविण्यापासून वैयक्तिक सेवक म्हणून ते सेवा करत. मान-सन्मानाच्या सेवेपासून ते सदैव दूर राहत. डिसेंबर १९६२ मध्ये बाबा अवतारसिंहजींनी निरंकारी मिशनच्या सद्‌गुरु रुपात बाबा गुरबचनसिंहजींना प्रगट केले तेव्हा आश्चर्यचकित होऊन ते म्हणाले, ''मी तर सद्‌गुरुचा साधारण प्रतिचा सेवक आहे. इतकी मोठी जबाबदारी मी कशी सांभाळणार ?''

निराकार प्रभूचा खेळ विलक्षण असतो आणि सद्‌गुरुचं कार्य देखील तोच करतो. समयानं सिध्द करुन दाखवलं की, सद्‌गुरु बनविला जात नाही तर जेव्हा, जसं आणि हवं त्याप्रमाणे स्वतःला प्रगट करत असतो. भोला किंवा शेठ म्हणून नावरुपाने प्रसिध्द असलेले बाबा गुरबचनसिंहजी आता जगासमोर सद्‌गुरु बाबा गुरबचनसिंहजी म्हणून प्रगट झाले होते. युगपुरुष बाबा अवतारसिंहजी सुमारे सात वर्षे एक गुरुभक्त म्हणून सद्‌गुरु बाबा गुरबचनसिंहजींजवळ राहिले, तरीही बाबा गुरबचनसिंहजींनी एका आदर्श पुत्राप्रमाणे आपल्या वडिलांचा यथोचित आदर करुन भरपूर सेवाही केली.

निरंकारी मिशनच्या सद्‌गुरुपदाची जबाबदारी खांद्यावर आल्यानंतर बाबा गुरबचनसिंहजींनी ज्ञानप्रचाराला मोठी गती दिली. त्यामुळे मोठ्या संख्येने लोक मिशनकडे आकर्षित होऊ लागले. ज्ञान प्राप्त करणाऱ्या जिज्ञांसूची संख्या उत्तरोत्तर वाढत जाऊन लाखोंच्या घरात गेली. प्रबंधकीय कार्यही खूपच वाढलं होतं. कार्य सांभाळण्यासाठी, अनुशासन बनविण्यासाठी आणि प्रबंध उत्तम ठेवण्यासाठी काही सुधारणा करण्याची

आवश्यकता जाणवू लागली. याराठी निरंकारी जगतातील प्रबंधक, प्रचारक, नगरातील प्रमुख आणि अधिकारी यांचं एक सभा संमेलन १९६५ मध्ये मसूरी येथे आयोजित करण्यात आले. या सभा संमेलनात प्रचाराला गती आणण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. प्रबंधाच्या दृष्टिकोनातून देशाची काही क्षेत्रात (झोन) विभागणी करण्यात येऊन क्षेत्रीय प्रभारी, प्रमुख, मुखी नियुक्त करण्यात आले. परदेशात वास्तव्य करणाऱ्या महापुरुषांच्या ठरावानुसार त्या देशात प्रचारयात्रा करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

१९६५ चे हे मसूरी सभा संमेलन म्हणजे निरंकारी मिशनच्या यश आणि उन्नतीची पोचपावती होती. मिशनचं कार्य चांगल्या पध्दतीने चालू लागलं आणि प्रचार-प्रसाराची घोडदौड वेगानं सुरु झाली. बाबा गुरबचनसिंहजींनी देशाच्या सीमा ओलांडून विश्वभरात सत्याचा संदेश प्रसारित करायला सुरुवात केली आणि देशव्यापी जनकल्याणाच्या आध्यात्मिक आंदोलनाला विश्वव्यापी स्वरुप दिले. अपरिचित देश, अपरिचित लोक, अपरिचित भाषा, लांबलचक प्रवास, धावपळ आणि थकवा, परदेशी चलनाची उणीव अशा एक नव्हे तर अनेक समस्यांना सामोरे जात काही वेळा उपाशीपोटी राहण्याची आणि काही वेळा साध्या जमिनीवरही झोपण्याची पाळी आली तरी कोणत्याही गोष्टींची पर्वा न करता १९६७ ते १९७७ पर्यंत विश्वकल्याणासाठी ज्ञानप्रसाराचं कार्य विश्वकल्याण यात्रेच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी चालूच ठेवलं.

बाबा गुरबचनसिंहजी आध्यात्मिक शिकवणीच्या

माध्यमातून मानवाचा चौफेर विकास करु इच्छित होते. पारिवारिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी सर्व अंगाने त्यांनी मानवजातीचं नेतृत्व करुन हेच सिध्द केलं की, आध्यात्मिक शिकवण मनुष्याला पलायनवादी बनवत नाही तर एक जबाबदार सुशिक्षित, सभ्य, आदर्श नागरिक बनवते. कोणतंही कार्य करण्याची त्यांची पध्दत विलक्षण होती. सामान्यतः लोक जेव्हा एखाद्या कार्याचा आरंभ करतात तेव्हा मोठ-मोठ्या योजना बनविण्यातच आपला वेळ वाया घालवतात, मात्र बाबा गुरबचनसिंहजी योजनेला त्वरित व्यावहारिक रुप देणाऱ्या सिध्दांतावर विश्वास ठेवत. त्यामुळेच अशक्य वाटणारी कार्येसुध्दा त्यांनी शक्य करुन दाखविली.

निरंकारी कॉलनीजवळ एक पडीक जमीन होती आणि ती नापीक असल्याने कोणतंही पीक उत्पन्न करु शकत नव्हती. त्याचवेळी देशात अन्न-धान्याची टंचाई असल्याने त्या नापीक जमिनीतून गुरबचनसिंहजींनी धान्य उत्पादन करायचे ठरवले. त्यांनी भारत सरकारच्या कृषि अनुसंधान केंद्राच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. जमिनीचे परीक्षण केल्यावर जमीन नापीक असल्याने कोणतेही उत्पादन देऊ शकणार नाही असा निर्णय कृषि अधिकाऱ्यांनी दिल्यावरही बाबा गुरबचनसिंहजी आपल्या निश्चयावर अटळ राहिले. त्या पडीक जमिनीच्या बाजूला एक सरकारी खत कारखाना होता आणि त्यातून बाहेर पडणारे दूषित पाणी आजूबाजूला दलदल निर्माण करत होते. कारखान्याची परवानगी घेऊन ते दूषित पाणी नापीक जमिनीत सोडण्याची योजना गुरबचनसिंहजींनी बनवली. ते दूषित पाणी नापीक जमिनीसाठी जणू उपयुक्त खतच सिध्द झाले. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्या जमिनीची स्वच्छता करुन तिला सपाट बनवून त्यात चांगल्या बियाण्याची पेरणी केली. कालांतराने त्या जमिनीतून जोमदार पीक बहरुन आलं. आजूबाजूचे शेतकरी आणि कृषि अधिकारीही नापीक जमीन सुपीक झाल्याचं पाहून आश्चर्यचकित झाले. या जमिनीतून उत्पन्न झालेले उत्तम प्रतिचे बीज त्यांनी आपल्या शेतकरी अनुयायींना वाटले जेणेकरुन ते उत्तम प्रतिचे पीक काढू शकतील. यावरुन बाबा गुरबचनसिंहजींनी प्रामाणिकपणा, दृढनिश्चय, तळमळ, कठीण परिश्रमाच्या जोरावर अशक्य गोष्ट शक्य करु शकतो हे सिध्द करुन दाखविले.

याप्रमाणेच जेव्हा देशात पेट्रोल टंचाई निर्माण झाली तेव्हा बाबा गुरबचनसिंहजींनी आपल्या निरंकारी मोटर वर्कशॉपमधील गाड्यांची पेट्रोलवर चालणाऱ्या इंजिनात बदल घडवून ती डिझेलवर चालण्यायोग्य बनविली जेणेकरुन पेट्रोलचा खप कमी झाला आणि मिशनच्या खर्चातही फारच बचत झाली.

युगपुरुषा बाबा अवतारसिंहजी १७ सप्टेंबर १९६९ मध्ये ब्रह्मलीन झाले. या काळात निरंकारी मिशन विश्वामध्ये प्रख्यात झालं होतं. त्यामुळे अनेक महापुरुषांची इच्छा होती की, शहनशाहजींचा अग्निसंस्कार थाटात करावा आणि त्यांचे स्मारक किंवा समाधी बांधावी. मात्र बाबा गुरबचनसिंहजी जाणत होते की, व्यक्तीपूजा आणि कर्मकांडातून लोकांना मुक्त करायचे आहे. ते लोक अशा भ्रमाच्या जाळयात फसून जातील, अवतारी महापुरुषांच्या शिकवणी आत्मसात करणे विसरुन जातील आणि त्यांच्या नावाचा व्यापार सुरु करतील. म्हणून सर्व रीतिरीवाज बाजूला सारुन शहनशाहजींच्या देहाचा विद्युत-संस्कार करण्याचा निर्णय गुरबचनसिंहजींनी घेतला आणि संध्याकाळी विशेष सत्संग आयोजित केला. पुढे त्यांनी १५ ऑगस्ट हा प्रेरणा दिवस म्हणून मानण्याचा आदेश दिला आणि १९७९ मध्ये याच दिवसाला मुक्ती दिवस असे नाव देऊन म्हटले की, याच दिवशी आपण त्या सर्व महापुरुषांच्या जीवनातून प्रेरणा घेऊया ज्यांनी या मिशनच्या प्रचार-प्रसारासाठी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केलं आहे. अशाप्रकारे बाबा गुरबचनसिंहजींनी कोणत्याही विशेष दिवसाला एखाद्या विशेष व्यक्तीशी जोडले नाही जेणेकरुन लोक पुन्हा बंधनात बंदिस्त होऊ नयेत.

बाबा गुरबचनसिंहजींनी दिवस-रात्र ज्ञानप्रचार आणि मानव उध्दाराच्या कार्याला वाहून घेतलं. दिवसेंदिवस साधसंगतची संख्या वाढू लागल्याने ठिकठिकाणी सत्संग भवन निर्मितीचे त्यांनी आदेश दिले. मोठ्या शहरात आणि गावोगावी विशाल भवन निर्माण होऊ लागली. भवन निर्मितीचे नकाशे आणि रुपरेषा स्वतः गुरबचनसिंहजी तयार करत. या भवनांचं सौंदर्य आणि भव्यता पाहून कोणी अंदाजही लावू शकत नव्हता की, भवन निर्मितीसाठी ज्या हातांनी कमाल केली आहे त्यांनी

कधीही इंजिनियरींगची पदवी प्राप्त केलेली नाही. बाबा गुरबचनसिंहजींच्या भवन निर्मितीच्या कलेचा सर्वांगसुंदर नमूना निरंकारी कॉलनीतील सत्संग भवनमधील वर बांधलेला हॉल जो पाहण्यासाठी लोक दूर-दूरुन येतात. सत्संग भवनमध्ये मोफत दवाखाने उघडण्याचा उपक्रम सुरु करण्यात आला.

१९७२ मध्ये पंचिसवा रौप्यमहोत्सवी निरंकारी संत समागम साजरा करण्यात येऊन निरंकारी महापुरुषांच्या श्रध्देखातर चलनी नोटांच्या रुपात सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी आणि त्यांची धर्मपत्नी निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी यांची रौप्यतुला करण्यात आली. लाखोंच्या उपस्थितीत महापुरुषांच्या श्रध्देचा स्वीकार करुन बाबा गुरबचनसिंहजी म्हणाले, ''या रौप्यतुलेत जमलेल्या रक्कमेतून एक पैसा देखील स्वतःच्या कौटुंबिक खर्चासाठी वापरला जाणार नाही. ही सर्व रक्कम मानव कल्याणासाठी वापरली जाईल. कारण या रकमेचा एक-एक पैसा संत महापुरुषांच्या काबाडकष्टातून आलेला आहे. श्रध्दा भावनेतून एकत्रित झालेला हा पैसा सर्वांना सुख देण्यास कारणीभूत होईल.''

बाबा गुरबचनसिंहजींनी केलेल्या ज्ञानाच्या प्रचार-प्रसारामुळे धर्माच्या नावावर रुढिवादी परंपरेत फसलेले आणि सामाजिक दुर्गुणांचे शिकार झालेले लोक मिशनच्या साधेपणा, सत्यता, प्रीत-प्रेमाच्या भावनांनी आकर्षित होऊन मोठ्या संख्येने निरंकारी मिशनमध्ये सामील होऊ लागले. लाखो व्यक्तिंच्या मोठ्या संख्येसाठी एकसारखं अनुशासन आणि कर्तव्य कर्मांची एखादी सुदृढ प्रबंधकीय व्यवस्था बनविण्याची आवश्यकता निर्माण झाल्याने बाबा गुरबचनसिंहजींनी १९७३ मध्ये मसूरी येथे दुसरे सभा संमेलन आयोजित केले. देश आणि परदेशातून सुमारे पाचशे प्रतिनिधी या सभासंमेलनाला उपस्थित राहिले. मिशनची प्रगती आणि मानवी जीवनाच्या उन्नतीचा प्रत्येक अंगाने मुक्त विचारविनिमय करण्यात आला. लोकशाहीच्या मौलिक सिध्दांतांचं महत्व प्रतिपादन करुन आपल्या प्रारंभिक भाषणात बाबा गुरबचनसिंहजी म्हणाले की, 'याठिकाणी प्रत्येकाने प्रत्येक विषयावर मनमोकळेपणाने आपले विचार प्रगट करायला हवेत, कोणत्याही दडपणाखाली नव्हे; भलेही ते दडपण शिष्टाचाराचे असो किंवा श्रध्देचे. प्रत्येक निर्णय हा

बहुमताने नव्हे, तर एकमताने (सर्वसंमतीने) होतो हा संत-परंपरेचा सिध्दांत आहे'.

हे सभासंमेलन म्हणजे निरंकारी इतिहासाचं सोनेरी पान म्हणून सिध्द झालं. एकमताने एक-एक कलम मंजूर करुन निरंकारी आचारसंहिता बनविण्यात आली खरी मात्र खऱ्या अर्थाने पाहिल्यास ती मानवसमाजासाठी उज्ज्वल घटना (संविधान - Constitution) असावी जेणेकरुन पूर्ण जगावर लागू केल्यास हे सकल विश्व एक सुंदरसा परिवार बनेल. या सभासंमेलनात जिथे प्रबंध आणि व्यवस्थेसंबंधी एकमताने निर्णय घेण्यात आले तिथे सामाजिक दृष्टीने मिशनला अशा दोन महत्त्वपूर्ण देणगी देण्यात आल्या जेणेकरुन निदान भारतीय समाज बाबा गुरबचनसिंहजींचा युगानुयुगे ऋणी राहील. त्या दोन देणग्या म्हणजे पूर्ण नशाबंदी (व्यसनमुक्ती) आणि हुंड्याच्या देव- घेवीचा व्यवहार न करता साधेपणाने विवाह करणे. निर्णय घेण्यात आला की, जगाची लाज आणि आजाराचे निमित्त दाखवून व्यसनांच्या आहारी जायचे नाही तसेच विवाहाप्रसंगी अनावश्यक देखावा आणि त्यावर होणारा वायफळ खर्च टाळावा, हुंड्याच्या नावाखाली देव-घेवीचा व्यवहार आणि जाती-पातीच्या सर्व बंधनांना मुठमाती देण्यात यावी.

बाबा गुरबचनसिंहजींनी नारीजातीला प्रत्येक समाजकार्यात सक्रिय भाग घेण्याची प्रेरणा दिली. मातृशक्ती ही जनजीवनाची प्राण असून ती जर दुर्बळ बनली तर समाजाचं अधःपतन होईल अशी धारणा असल्याने क्रियात्मक रुपाने नारीजातीचा सन्मान करण्यासाठी बाबा गुरबचनसिंहजींनी आपल्या धर्मपत्नीला मिशनच्या प्रचार-प्रसार समयी स्वतःबरोबर

ठेवलं आणि व्यासपीठावरही बसवलं. अशाप्रकारे त्यांनी नारीजातीचा उत्साह तर वाढवलाच शिवाय नारीला पुरुषासमान दर्जा आहे हे सिध्द केले. त्यांच्या धर्मपत्नीनेही (निरंकारी राजमाताजी) आपल्या कर्मठ जीवनातून सिध्द केले की, खरोखरच सामाजिक उन्नतीसाठी मातृशक्ती अर्थात नारीजातीचा पूर्ण सहयोग अनिवार्य आहे.

मसूरी सभासंमेलना नंतर निरंकारी मिशन जनजीवनाला प्रभावित करु लागल्याने हे मिशन आता जनतेचं मिशन बनलं होतं. त्यामुळे ज्यांच्या आर्थिक आणि राजकीय स्वार्थाला धक्का बसण्याची भीती उत्पन्न झाली होती त्यांना निरंकारी मिशनची वाढती लोकप्रियता सहन झाली नाही. वर्षानुवर्षे ते विरोध तर करतच होते, परंतु निरंकारी मिशनचा होणारा विस्तार पाहून त्या स्वार्थी आणि दुराग्राही लोकांनी योजनाबध्द पध्दतीने धर्माचा आधार घेऊन निरंकारी मिशनला संपविण्याचे प्रयत्न सुरु केले. बिनबुडाचे आणि काल्पनिक आरोप करुन मिशनची बदनामी करण्यास सुरुवात केली. कोणतंही यश मिळत नाही हे पाहून त्यांनी अखेर हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला. जागोजागी निरंकारी सत्संगाला अडथळा आणण्यासाठी विटा-दगडांचा मारा करण्यात आला. इतकं करुनही निरंकारी जराही विचलित होत नसल्याने पठाणकोट आणि धुमान येथे बाबा गुरबचनसिंहजींवर दहशतवादी हल्ले करण्यात आले, परंतु तेही अयशस्वी झाले.

१३ एप्रिल १९७८ मध्ये अमृतसर (पंजाब) येथे वार्षिक प्रादेशिक संत समागम (मानव एकता संमेलन) प्रसंगी सुमारे २५० दहशतवादी लोकांनी बंदूका-तलवारीनिशी निरंकारी महापुरुषांवर प्राणघातक हल्ला केला. शांतपणे बसलेल्या नर-नारी, निरागस बालकं आणि वयोवृध्दांच्या रक्षणासाठी निरंकारी युवकांनी हल्लेखोरांचा सामना करण्यासाठी आपले प्राण प्रणाला लावले. या भ्याड हल्ल्यात अठराजण मृत्युमुखी पडले. या घटनास्थळापासून सद्गुरु बाबाजी फारच दूर होते. ही बातमी कानी पडताच सद्गुरु बाबाजी घटनास्थळी त्वरित दाखल झाले आणि मनात सुडाची कोणतीही भावना न आणता शांतपणे आपापल्या घरी जाण्याचा आदेश निरंकारी संतांना दिला. हल्लेखोरांना शासन करण्याऐवजी तत्कालीन अकाली-जनता सरकारने साठ निरंकारी महापुरुषांना अटक करुन त्यांना दोषी ठरविले आणि बिनबुडाचे खोटे आरोप लावून न्यायालयात खटला दाखल केला. बाबा गुरबचनसिंहजींवर देखील निरर्थक आरोप करण्यात आले आणि त्यांना पकडण्याचे वॉरंट सुध्दा काढण्यात आले. या अमृतसर हत्याकांडाचा खटला कर्नाल येथील सेशन न्यायालयात चालू असताना निरंकारी महापुरुषांना पंजाबमध्ये रोजच धमक्या दिल्या जात होत्या. सर्वत्र दहशतवादाचं भयंकर वातावरण होतं. न्यायालयात खटला चालू असताना सप्टेंबर १९७८ मध्ये कानपूरच्या सत्संग भवनमध्ये सद्गुरु बाबाजी पोहचताच कृपाण -बंदूकीने हल्ला करण्यात आला. भवनमध्ये सहा जणांचे प्राण घेण्यात आले, तर ७०-८० जणांना जखमी करण्यात आले. हल्लेखोरांनी कोणाची बोटं कापली, तर कोणाचे हात-पाय कापले. कर्नालच्या सेशन न्यायालयात हा खटला चालला होता. म्हणतात ना की, शेवटी सत्याचाच विजय होतो आणि असत्याला पराभूत व्हावं लागतं. ४ जानेवारी १९८० मध्ये न्यायाधीशांनी खटल्याचा निकाल जाहीर करुन बाबा गुरबचनसिंहजी आणि साठ निरंकारी महापुरुषांना निर्दोष मानून मुक्त केले तसेच पंजाब सरकार आणि पोलिसांवर बिनबुडाचे खोटे आरोप लावण्याच्या पध्दतीचा अवलंब केल्याबद्दल ताशेरे ओढण्यात आले. या ऐतिहासिक खटल्याची विश्वातील अनेक वर्तमानपत्रात चर्चा होत राहिली, तर न्यायालयाच्या निर्णया नंतर पंजाब सरकारला धारेवर धरले. पंजाबच्या जनतेनेही ६ जानेवारी १९८०च्या विधानसभा निवडणूकीत अकाली-जनता पक्षाला भूईसपाट करुन आपला निर्णय दिला. अखेर सत्याने जनसमाज आणि कायद्याचे दोन्ही खटले जिंकले.

अमृतसर हत्याकांडाचा कट फसल्यानंतर दहशतवादी पुन्हा गुप्तकट रचू लागले की, आता निरंकारी बाबाजींनाच संपवूया जेणेकरुन संपूर्ण निरंकारी मिशनच संपून जाईल. मार्च १९८० मध्ये मध्यप्रदेशातील दुर्ग येथे प्रचारानिमित्त आलेले असताना बाबाजींच्या गाडीवर अंधाधुंद गोळीबार करण्यात आला ज्यात एक भगिनी शहीद झाली. सुदैवाने सद्गुरु बाबाजी त्या गाडीत नव्हते. या प्राणघातक हल्ल्याबद्दल बोलताना बाबा गुरबचनसिंहजी म्हणाले, **"एखादं शरीर हेच मिशन**

आहे असा विचार मनात कधीही आणू नका. दातार कोणत्याही शरीराकडून कार्य करवून घेऊ शकतो आणि त्याचीच मर्जी आहे. जर हा या शरीराकडून कार्य करवून घेऊ इच्छित नसेल, तर आणखी दुसऱ्या शरीराकडून करवून घेऊ शकतो." हा कट फसल्यानंतर अखेरचा गुप्तकट यशस्वी करण्यासाठी न जाणो किती तरी बेत रचले गेले आणि अखेर २४ एप्रिल १९८० मध्ये युगप्रवर्तक निरंकारी बाबा गुरबचनसिंहजी यांची दिल्लीच्या निरंकारी भवनातील त्यांच्या निवास-स्थानासमोर अंधाधुंद गोळीबार करुन हत्या करण्यात आली. मानवाला प्रीती-प्रेम शिकविणारा एक अलौकिक शिक्षक एका राक्षसाच्या विश्वासघाताचा बळी ठरला.

निरंकारी बाबा गुरबचनसिंहजींच्या हत्तेचं वृत्त ऐकताच सर्व जग सुन्न झालं. मानवता चीत्कार करुन उठली आणि विशाल मानव परिवार ओक्साबोक्शी रडू लागला. कदाचित असं एखादं हृदय नसेल जे त्या दिवशी हळहळलं नाही. कदाचित असे एखादे डोळे नसतील जे अश्रूंनी पाणावले नाहीत. वर्तमानपत्रांनी यावर भाष्य करताना लिहिलं की, मानव एकतेचा एक देवदूत आणि एक अलौकिक समाजसुधारक देशाचा कायदा आणि व्यवस्थेच्या ढिलेपणाचा शिकार बनला. विद्वानांनी म्हटलं की, विश्वाच्या इतिहासाचं आणखी एक पान काळंकुट्ट झालं.

बाबा गुरबचनसिंहजींनी मनुष्य जीवनाचे प्रत्येक अंग प्रभावित केले. त्यांनी देशाला सामाजिक चेतना प्रदान केली, आर्थिक गतिशीलता आणि राजकीय मूल्यांची स्वच्छता करण्यासाठी आपलं विशेष योगदान दिलं. ज्ञानमार्गाच्या जिज्ञासूंना आत्मतत्वाचा बोध करवून त्यांना अनुपम शांती आणि आनंदाची प्राप्ती करुन दिली. त्यामुळे मागासलेल्या वर्गातील मनुष्य असो किंवा उन्नत आणि समृध्द समाजाचा असो, गावातील अशिक्षित असो किंवा आधुनिक शहरातील सुशिक्षित, लहानसा कार्यकर्ता असो किंवा मोठ्यात मोठा राष्ट्रीय पुढारी आणि कोणत्याही धर्म, जात, संप्रदायाचा असो; ते सर्व त्यांचे मित्रासमान होते. प्रत्येकाबरोबर ते असं काही प्रेम करत की, प्रत्येकजण हेच माझे बाबाजी आणि फक्त माझेच बाबाजी असं समजत. इतकी लोकप्रिय व्यक्ती इतिहासात कदाचित एखादीच झाली असेल. सद्गुरु रुपात फक्त सतरा वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी इतक्या विलक्षण गतीनं कार्य केलं की, इतिहासातील असं उदाहरण सापडत नाही.

सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे बाबा गुरबचनसिंहजींनी जगातील सर्व समस्यांचं उत्तर ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून दिलं. जर मनुष्यानं या परमपिता परमात्म्याला जाणून त्याच्याशी आपलं नातं जोडलं आणि त्याची भक्ती उपासना करत राहिला, तर जगातील प्रत्येक समस्या सहजतेने सोडवू शकतो हे त्यांनी सिध्द करुन दिलं.

युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी एक महान महापुरुष होते, एक मिशन होते, एक विचारधारा होते. समाजासाठी एक आदर्श होते, जन-जीवनासाठी एक प्रेरणा होते. एक महान कर्मयोगी, ब्रह्मज्ञानाचं अलौकिक भांडार आणि खऱ्या अर्थाने बाबा गुरबचनसिंहजी म्हणजे एक पूर्ण पुरुष होते. अशा या विलक्षण विभूतीबद्दल हेच म्हटलं जाईल.....

गुरबचन एक मिशन था जिने का इक अन्दाज था।
तान बस उल्फत की छेडे गुरबचन वो साज था।
वक्त का मालिक था साहिब वक्त की आवाज था।
सिर्फ न था राजदाँ वो इक इलाही राज था।

संकलन - **श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर**
(वरळी, मुंबई)

मातृवचनामृत

संतजनांनो! गुरसिख त्यालाच म्हणतात जो क्षणोक्षणी गुरुच्या शिकवणीकडे ध्यान देतो की, आम्ही जीवनात कसं चालायचं हे सद्गुरु इच्छित आहेत आणि आमच्याकडून कोणकोणत्या अपेक्षा बाळगून आहेत. गुरसिख प्रत्येक क्षणी आपल्या गुरुची शिकवण मनात स्थापित करतो जेणेकरुन त्याच्या उठणे, बसणे, पाहणे इत्यादी सर्वात परिवर्तन दिसून येतं. आपण सत्संगात येणाऱ्या मुलांची वागणूक पहा आणि समाजात राहणाऱ्या मुलांची वागणूक पहा. संतांच्या बोलण्याची भाषा पहा आणि ज्या जगात आपण राहतोय तेथील राहणाऱ्यांची बोलण्याची भाषा पहा. तेव्हा अंतर स्पष्ट दिसून येतं की, गुरुकृपेमुळे आपल्या जीवनात किती अंतर येतं. गुरुच्या कृपेनेच प्रभू परमात्म्याला जाणलं जाऊ शकतं, स्वत:हून जाणू शकत नाही. त्याबद्दल म्हटलं आहे की....**अपनी करनी ते नरक न पाऊँ ठौर।**

भावार्थ, आपल्या करणीने तर कदाचित नरकातही जागा मिळू शकणार नाही मात्र जेव्हा सद्गुरुची महान कृपा होते तेव्हा गुरसिखचा एक-एक शब्द गुरबाणीत (ग्रंथात) नमूद केला जातो. आपण सर्वजण भाई गुरदासजींना जाणता. त्यांच्या शब्दांना गुरुग्रंथसाहिबच्या किल्लीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यांच्या जीवनातील एक घटना आहे.....

जेव्हा जेव्हा ते मंचावर (स्टेज) उभे राहत तेव्हा 'जे गुर सांग वरतदा सिक्ख सिदक न हारे' या वाक्याची पुनरावृत्ती करत. एके दिवशी गुरुसाहिब त्यांना म्हणाले, ''या काही अशर्फी (सोन्याच्या मोहरा) घेऊन जा आणि घोडे खरेदी करुन घेऊन या.'' भाई गुरदासजी तिथून निघाले. एका ठिकाणी घोड्यांच्या व्यापाऱ्याबरोबर सौदा नक्की झाला. मोहरा आणण्यासाठी आपल्या तंबूत गेले तेव्हा त्यांना त्या मोहरा दगडी खड्याप्रमाणे दिसू लागल्या. विचार करु लागले की, 'आता काय करु? व्यापारी तंबूच्या बाहेर उभे आहेत आणि सौदा तर नक्की झाला आहे, त्यांना आता तोंड कसं दाखवू?' काय केलं, तंबूचा कपडा फाडून मागील बाजूने दुसऱ्या नगराकडे चुपचाप निघून गेले. तिथे जाऊनही ते गुरुची महिमा गाऊ लागले.

जेव्हा भाई गुरदासजी बरेच दिवस झाले तरी परत आले नाहीत म्हणून गुरुसाहिबांनी काही सेवकांना भाई गुरदासजींना शोधून आणण्यासाठी पाठविले. शोधत शोधत सेवक एका तंबूजवळ पोहोचले. पाहिलं, तर तंबूत मोहरांचा ढीग लागला असून तिथे मात्र कोणीही हजर नव्हते. चौकशी केल्यानंतर समजले की, भाई गुरदास अमूक एका नगरात गेले आहेत. परत येऊन गुरुसाहिबांना सेवकांनी सर्व सांगितले तेव्हा गुरुसाहिब म्हणाले, ''तो जिथे कुठे असेल तिथे जाऊन त्याला मुसक्या बांधून घेऊन या.'' जेव्हा त्यांना बांधून आणले तेव्हा गुरुसाहिब स्मितहास्य करत म्हणाले, ''भाई गुरदास, त्या गोष्टीची पुन्हा पुनरावृत्ती करा जी तुम्ही रोज वाचून दाखवत होता.'' तेव्हा भाई गुरदास म्हणाले,

जे गुर सांग वरतदा सिक्ख सिदक न हारे।

नाही, इतकेच नव्हे तर,

जे गुर सांग वरतदा क्या सिक्ख विचारे।

संतजनांनो! जेव्हा आपल्या मनाचं नातं सद्गुरुशी जोडलं जातं तेव्हाच या गोष्टी आपल्याला समजू लागतात. नाहीतर मनाबद्दल आपण सर्व जाणताच की, मन तर इतकं उंच-उंच भरारी मारतं की, त्याच्यापर्यंत कोणीही पोहचू शकत नाही. काही वेळा आपल्याबरोबर

बसलेल्या व्यक्तीशी बोलून पाहिल्यास त्याचं ध्यान-मन आणखी कुठे तरी गेलेलं असतं. आपण एक-दोनदा त्याला एखादी गोष्ट सांगतो आणि आपल्या गोष्टीचं जर उत्तर देत नसेल तर आपण त्याला हिसके मारुन म्हणतो, ''अरे, तुझं ध्यान कुठे आहे? एक-दोन वेळा तुला विचारलं, परंतु त्याचं तू कोणतंही उत्तर दिलं नाहीस.'' त्यावर तो म्हणतो, ''होय! माझं मन आणखी कुठे तरी गेलं होतं.'' संतजनांनो! शहनशाह बाबा अवतारसिंहजी म्हणत, '' जिथे जाल तिथे ध्यानपूर्वक ऐका. जर ध्यानपूर्वक ऐकलंत नाही, तर ते योग्य बोलतात की अयोग्य किंवा त्यांचे विचार कसे आहेत हे कसं सांगू शकाल? जर आपण आपल्याच गोष्टीत गढून जाल. ध्यानपूर्वक ऐकलंतच नाही; तर आपण कोणतं उत्तर देऊ शकणार? ज्यांनी देखील महात्म्यांच्या गोष्टी ध्यानपूर्वक ऐकल्या, आज त्यांच्या गोष्टीही ध्यानपूर्वक ऐकल्या जात आहेत.''

संतजनांनो! सर्व गुरु-पीर पैगंबरांनी आपल्या वाणीतून प्रत्येक वेळी प्रेम-नम्रतेचीच गोष्ट सांगितली आहे. जेव्हा आपण गुरु नानकदेवजींची 'वाणी' वाचतो तेव्हा ते सुध्दा आपल्या वाणीत म्हणतात,

नानक दासु इहै सुखु मांगै मो कउ करि संतन की धूरे।

तसेच

धूडी विचि लुडदडी सोहां नानक तै सह नाले।

इतकी नम्रता, इतकं प्रेम! आणि आपण ते वाचणारे, एक-दोन शब्द वाचूनच स्वतःला फारच उच्च समजू लागतो. आमच्यासारखा कोणी उच्च नाही असंही मानू लागतो. बाकी इतर आमच्यापेक्षा हीन आहेत. आम्ही सर्वकाही जाणतो, ते आमच्यापेक्षा अधिक काही जाणत नाहीत.

संतजनांनो! जर आपण भक्तांच्या एका शब्दाला देखील आपल्या हृदयात स्थापित केले, तर जीवन असं बनतं की ज्याची उदाहरणं दिली जाऊ शकतात. भक्त तेच असतात ज्यांच्यासाठी म्हटलं आहे की,

भगत तेरै मनि भावदे दरि सोहनि कीरति गावदे।

तेच भक्त शोभायमान असतात जे याची (निराकाराची) कीर्ती आणि स्तुती करतात. जे निंदा, चुगली, वैर, विरोधाच्या आहारी जातात ते भक्त नसतात. जर आपण (निराकार प्रभूची) स्तुती करणाऱ्यांच्या शिकवणीनुसार चाललो, तर हे जीवन फारच प्रसन्नमय होईल, आपलं मनही आनंदित होईल आणि वातावरणही प्रसन्नमय बनेल. कारण मनाची अवस्थाच अशी आहे की, आपण वातावरणाचाही तसाच प्रभाव ग्रहण करता. ज्याप्रमाणे पाऊस पडल्यावर पानं आणि गवतावर पावसाचे थेंब पडलेले असतात. ते थेंब पाहून ज्याचं मन आनंदित होतं तो म्हणतो की, हे थेंब किती छान दिसत असून जणू काही मोतीच विखुरलेले आहेत आणि ज्याच्या मनात खिन्नता असते तो म्हणतो की, पहा ईश्वरही अश्रू ढाळीत आहे. याप्रमाणेच काही वेळा आनंदाच्या भरात असा विचार करत घराबाहेर पडतो की, चला मित्राच्या घरी जातो आणि तिथे चांगली हास्य-मस्करी करतो. जेव्हा तिथे जातो तेव्हा मित्र खिन्न अवस्थेत असून रडत आहे. त्यावेळी आपण काय करतो? मित्रासारखी खिन्न अवस्था बनवून त्याच्यासारखाच रडवेला चेहरा बनवतो. याच्या विपरीत जेव्हा आपण खिन्न मनाने घराबाहेर पडतो आणि मित्राच्या घरी हास्य-मस्करी चाललेली असेल, तर त्यावेळी आपणही आपला स्वभाव हास्यमय-आनंदी बनवतो. आपण हे देखील पाहिलं असेल की, जेव्हा मुलं आरशासमोर उभी राहून जीभ बाहेर काढून दाखवतात तेव्हा आरशातही जीभ बाहेर आलेली दिसते. जर आरशासमोर रडायला सुरुवात केली, तर आरशातही रडवं प्रतिबिंब दिसतं. जर ते हसायला सुरुवात करतात किंवा स्वतःला चित्रविचित्र दाखवायला लागतात, तर आरशाने भीड न बाळगता जसंच्या तसं दाखवायचं असतं. भावार्थ, भक्तीबाबतही असंच आहे. जस-जसा कोणी मनात विश्वास आणतो, खरेपणा आणतो आणि आपल्या गुरुवर विश्वास दृढ करतो तस-तसा तो आनंद आणि खूशी प्राप्त करत जातो.

या संतजनांनो! हीच अरदास, प्रार्थना करुया की दातार आम्हाला भक्तीच्या रंगात रंगवून ठेव जेणेकरुन आमचा विश्वास आणि भरवसा दृढ राहील.

- निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी

स्त्री जीवनाचे कर्तव्य

सकल विश्वाचा विचार करता स्त्रीशक्ती विना संसार अपूर्ण आहे. स्त्री जीवनातील महत्त्वपूर्ण भूमिका म्हणजे एक कन्या, दुसरी पत्नी, तिसरी आई. आईच्या भूमिकेत स्त्रीला आपल्या मुलाचे संगोपन आणि संस्कार काटेकोरपणे करावे लागतात. कारण त्याच्यातूनच पूर्ण विश्वाची सेवा करणारा युवक घडतो. म्हणूनच स्त्रीला समाजाचा आधारस्तंभ म्हटलं जातं. याचे कारण वडिलांपेक्षा आईच मुलांजवळ जास्त वेळ असते म्हणून स्त्रीचे पुरुषांपेक्षा मुलांचे संगोपन योग्य पध्दतीने करु शकते. तेव्हा ती स्त्रिचीचं जबाबदारी समजली जाते. म्हणून समाजात, कुटुंबात स्त्रीला अनन्य साधारण महत्त्व आहे.

इतिहास साक्षी आहे की, प्रत्येक पराक्रमी, कर्तृत्ववान पुरुषापाठीमागे स्त्रिचाच हात असतो. म्हणून म्हटले आहे की, पुरुषांच्या यशात स्त्रिचा सिंहाचा वाटा असतो. अशा स्त्रियांची नावं इतिहासात सुवर्णाक्षरात लिहून ठेवली आहेत. उदाहरणच द्यायचं झालं तर शिवाजी महाराजांची आई जीजाऊ, साने गुरुजींची आई (श्यामची आई), बाबा गुरबचनसिंहजी महाराजांची आई जगतमाता बुध्दवंती कौरजी, सगयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांची आई राजमाता कुलवंत कौरजी अशा कितीतरी थोर महापुरुषांना घडविणाऱ्या आदर्श आईची उदाहरणे आहेत.

निरंकारी जगतात तर जगतमाता बुध्दवंती कौरजी, राजमाता कुलवंत कौरजी, पूज्यमाता सविंदर कौरजी यांचा नावलौकिक आपणास प्रत्यक्ष पहायला, वाचायला मिळाला आहे. त्यांनी तर स्वतःच्या मुलांचे संगोपन करता करता सकल विश्वातील मुलांचे केले. तसेच स्वतःच्या मुलांबरोबर इतरांवर संस्कार केले. याचा विचार करता एक सुविचार आठवतो, 'स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी." म्हणून सांगावसं वाटतं की, एवढं आईचं महत्त्व (पावित्र्य) जगाच्या पाठीवर विख्यात आहे.

या विश्वातील सर्वात सुंदर असं एक अस्तित्व म्हणजे रचनाकार विधात्याने पराकाष्ठेची आणि परमोच्च अशी बनवलेली सोज्वळ मूर्ती कोणती असेल तर ती म्हणजे 'आई'. वात्सल्य मूर्ती आई म्हणजे आद्यशक्ती आणि जगतजननी, आई म्हणजे तिच्या बाळाची पहिली गुरु असते. अशा स्त्रिबद्दल बऱ्याच गोष्टी सांगत असताना आवर्जुन श्यामच्या आईचे उदाहरण द्यावेसे वाटते. श्यामची आई श्यामला म्हणत असे, 'अरे, श्याम ज्याप्रमाणे तू पायाला घाण लागू नये म्हणून एवढं जपतो तसं मनाला घाण लागू नये म्हणून जप." एवढा आईचा मुलांवर संस्कार करत असताना तप-त्याग असावा लागतो.

इथे आपण नारीचा (स्त्रीचा) विचार करत असताना सांगावसं वाटतं की, एखादी मुलगी जेव्हा मुलीच्या (कन्येच्या) भूमिकेत असते तेव्हा तिची ओळख एक सुसंस्कृत मुलगी म्हणून व्हावी. ज्यावेळी स्त्रीही पत्निच्या भूमिकेत असते तेव्हाही तिला एक आदर्श माता म्हणूनच पहिली जावी. तरच स्त्री जीवनाला श्रेष्ठत्व मिळेल, अन्यथा सर्व व्यर्थ.

ब्रह्मज्ञान आत्मसात करावे आणि आपल्या जीवनातील अज्ञानरुपी अंधःकार दूर करावा. आपले जीवन ज्ञानरुपी प्रकाशात प्रकाशमान करावे. ज्यावेळी आपले जीवन प्रकाशमान स्वच्छ – निर्मळ होईल तेव्हा आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक मानव जातीचेही जीवन प्रकाशमय, स्वच्छ, सुंदर होईल.

हा सर्व विचार स्त्रीबद्दल का करावसा वाटतो, तर स्त्री ही कर्मकांड करण्यास पुढे असते, स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचा छळ करण्यास पुढे असते, स्त्रीच भ्रुनहत्या करण्यास पुढे असते. म्हणून परिवारातील स्त्रीच जर पूर्ण ज्ञानी असेल तर तो परिवार स्वर्गमय होईल आणि जर त्या परिवारातील स्त्री जर अज्ञानी असेल तर घर नरकासमान होईल. तरीही स्त्रीजन्माला सार्थकी लावण्यासाठी एक सुविचारही आहे, 'मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी." तरीही हे सर्व माहीत असूनही स्त्री अजून अज्ञानरुपी अंधारातच वावरत आहे.

समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी माझ्या सारख्या लाखो स्त्रियांच्या जीवनातील अंधार दूर केला. त्यांनी या स्त्रीजीवनाचा उध्दार केला. त्यांनी स्वतःच्या परिवाराचे उदाहरण समोर ठेवून म्हणजे आपली आई (राजमाताजी) व आपली धर्मपत्नी (पूज्य माताजी) यांना बरोबर घेऊन अहोरात्र या सत्याचा प्रचार करताहेत, खरोखरच अशा परमपित्या परमात्म्याचा अवतार जन्माला घालणारी धन्य ती आई.

म्हणून प्रत्येक स्त्रीला ज्ञान मिळावं. ती पूर्ण ज्ञानी बनून तिने आपला परिवार आदर्श बनवावा. आपल्या स्त्रीजन्माचं (जीवनाचं) सार्थक करावं. नेहमी सत्संग, सेवा, नामस्मरणात गढून जावं. भौतिक सुखाचा त्याग करुन परमात्म्याशी समरस व्हावं, सद्गुरुंची वचनं कर्मात उतरवावीत आणि आपला इहलोक सुखमय व परलोक सुलभ करावा हीच सद्गुरुचरणी सकल नारी जातीसाठी प्रार्थना करते.

सौ. आशा सिध्देश्वर गायकवाड
मु. पात्रेवाडी, पो. शेटफळे,
ता. आटपाळी, जि. सांगली

~~~~~~~~~
~~~~~~~~~

विवेक विचारधारेचा अनमोल खजिना

आपला क्रोध, लोभ, मोह, अहंकार त्या विसाव्या उंटाप्रमाणे जागोजागी टाकून देण्याची गरज पडते; तेव्हाच हे जग चालतं. अर्थात त्याची जितकी गरज असते तितका उपयोग करुन ब्रह्मज्ञानी ते काढूनही टाकतात. गोष्टच निकालात निघाली. मला माझ्या कार्यालयात आपलं काम योग्य पध्दतीने करण्यासाठी जितक्या क्रोधाची आवश्यकता आहे तितका क्रोध माझ्याजवळ आहे आणि मी त्याचा वापरही करतो. मी क्रोधाचा वापर करतो, पण क्रोध माझा वापर करत नाही. जेव्हा गरज संपली तेव्हा तो क्रोध काढून टाकला. माझं घर चालविण्यासाठी इतक्या गर्वाची गरज होती म्हणजेच अरे भाऊ, मी घरात मोठा आहे आणि तुम्हा सर्वांना माझं म्हणणं मान्य करावं लागेल; जितक्या गर्वाची गरज होती तितका उपयोगात आणून मग त्याला चालतं केलं, त्याला बाळगून बसलो नाही. निराकार दातार प्रभूनं बनविलेली एखादी वस्तू किंवा आपल्याला दिलेला गुण किंवा ज्याला अवगुणही म्हणतो; तो चुकीचा नसतो. ज्या दिवशी ब्रह्मज्ञानी महात्मा त्या गुणांचा उपयोग शिकवतात; आपलं जीवन सुधरतं, आयुष्य बनतं, प्रत्येक गोष्टीचा आनंद मिळतो, प्रत्येक गोष्टीत शिकायला मिळतं आणि प्रत्येक गोष्टीपासून काहीतरी समजून घ्यायला मिळतं. दास त्या दिवशीही उल्लेख करत होता की; जर प्रत्येक गोष्टीत आनंद आहे, जर प्रत्येक गोष्टीत परमात्मा आहे, जर प्रत्येक ठिकाणी परमात्मा आहे तर मग पाहण्यासाठी ती (ज्ञान) दृष्टी हवी. परमात्म्याला तर कुठून आणायचं नाही, परमात्मा तर सुरुवातीपासूनच उपस्थित आहे. सद्गुरु बाबाजींनी सुध्दा सांगितलं आहे की, मी परमात्म्याला कुठूनही आणून देत नाही, परमात्मा तर इथेच असतो; मी फक्त तो दाखवतो. आता ही दृष्टी सद्गुरु देतो. याची स्वतःची दृष्टी अशी आहे जी प्रत्येक गोष्टीला सांगून जोडते. दास जी गोष्ट सांगणार आहे ती आठ-नऊ वर्षांपूर्वीची आहे. उन्हाळ्यातील मे-जून महिन्यात सद्गुरु बाबाजींचं जास्तकरुन मसूरीला एक-दीड महिना वास्तव्य असतं. दासही सोबत होता. मसुरीला भवन आहे. तिथे पहिल्या मजल्यावर त्यांची खोली आहे. खोलीतून बाहेर पडून ते गच्चीवर येऊन उभे राहिले. त्यांच्याबरोबर उभे राहण्याचा दासालाही योग लाभला. सद्गुरु बाबाजींनी खाली पाहिलं आणि बाबाजी काय पाहात आहेत हे सुध्दा दासनं पाहिलं. खाली काही महात्मा उभे राहून आकाशात उंच जाणारा गॅसचा फुगा पाहात होते. दासनेही पाहिलं. बाबाजींनी हळूच विचारले, ''काय झालं बाबांनो?'' महापुरुषांनी गच्चीवर पाहिलं की, सद्गुरु बाबाजी उभे आहेत. नमस्कार करुन महापुरुष म्हणाले, ''बाबाजी! तसं काही नाही. एका मुलाच्या हातातून गॅसचा फुगा सुटला आणि वर उडाला.'' स्मितहास्य करुन बाबाजी आपल्या खोलीत परतले आणि तेथे आणखी एक गॅसचा फुगा छप्पराला लटकला होता आणि त्याचा धागा लोंबकळत होता. एखाद्या मुलाने फुगा आणला असेल. त्यावेळी समताजी, रेणूकाजी, सुदिक्षाजी देखील लहान-लहान मुलं होती. कदाचित त्यांच्यापैकी कोणीतरी तो फुगा आणला असेलही. तर तिथून जाता जाता बाबाजींनी तो धागा पकडून सहजतेने सोडूनही दिला आणि पुढे निघून गेले. त्यांच्या मागोमाग दासही होता. दुपारची वेळ होती आणि बाबाजींच्या जेवणाचीही वेळ झाली होती. जेवण वाढण्यात आले, बाबाजी जेवले आणि झोपण्यासाठी निघूनही गेले...विषय संपला. आणखी पंधरा-वीस दिवस निघून गेले. असं काही झालं होतं ही गोष्ट देखील डोक्यातून निघून गेली होती. एक महिन्यानंतर दिल्लीमध्ये रविवारीय सत्संगात असाच हॉल ठासून भरला होता. सद्गुरु बाबाजी आपल्या प्रवचनात म्हणत होते.....यावेळी मसूरीत एक घटना पाहायला मिळाली. त्यावेळी मसूरीत आम्हीही त्यांच्याबरोबर होतो. त्यामुळे आम्हीही कान टवकारले की, न जाणो बाबाजी कोणत्या घटनेची गोष्ट बोलत आहेत. बाबाजींनी ती सर्व कहाणी सांगितली की, गच्चीवर उभा होतो आणि गॅसचा एक फुगा वर उडत असलेला दिसला. विचार करु लागलो की, मी सुध्दा त्यावेळी हजर होतो. पहा ही गोष्ट बाबाजी कुठे जोडत आहेत, कारण ते दृश्य माझ्याही डोळ्यांनी पाहिले होते जे बाबाजींच्या डोळ्यांनीही पाहिले होते; पण हे का सांगत आहेत? पहा, बाबाजी ती गोष्ट कशी जोडून सांगत आहेत. बाबाजी म्हणाले, ''तो फुगा आकाशात उडत होता. नंतर खोलीत येऊन पाहतो, तर तसाच एक फुगा छप्पराला लटकला असून धागा लोंबकळत होता. मनात विचार आला

की, गॅसही तोच आहे आणि फुगाही तसाच आहे. मग कोणते कारण असावे की, एक फुगा आकाशाच्या उंचीला स्पर्श करतोय आणि एक फुगा मात्र छप्पराला लटकतोय. कारण हेच आहे की, उडणाऱ्या फुग्याने आपल्या डोक्यावर छप्पर ओढलेलं नाही आणि लटकणाऱ्या फुग्याने आपल्या डोक्यावर छप्पर ओढलं आहे. ठीक याप्रमाणेच आपल्याला ज्ञान तर तेच दिलं जातं. सामग्री (material) देखील तीच आहे, परंतु आपल्या डोक्यावर उच्च-नीच, लहान-मोठा,गरीब-श्रीमंत, जात-पात, विद्वान आणि अक्कलशून्यचं छप्पर आहे. ती छप्परं मला उच्च होऊ देत नाहीत. एकदा का जर ही छपरं आपल्या डोक्यावरुन उचलून पाहिल्यास कोणीही उच्चत्वाच्या उंचीवरुन अडवू शकणार नाही. संतजनांनो! आश्चर्यचकित झालो की, अरे! तोच गॅसचा फुगा तर मी देखील पाहिला होता, परंतु त्यातून सद्गुरु बाबाजी कोणती गोष्ट काढणार हे मात्र समझू शकलो नाही. ही असते सद्गुरुची अवस्था. जे कोणी प्रत्येक गोष्टीत काहीना काही असं सांगतात, काहीना काही असं दाखवतात आणि म्हणतातही, ''बाबाजी! माझ्याबरोबर तर असं नाही झालं, माझ्याबरोबर तर हे घडलं, मी तर फारच चिंताग्रस्त आहे, मी अत्यंत दुःखी आहे.'' त्याचवेळी विचार करा की, मी दुःखी का आहे? माझ्या दुःखाचं कारण कोणतं आहे? बाबाजींना सांगण्याऐवजी स्वतःलाच विचारा की, मी दुःखी का आहे? जो सुखी आहे त्याला बाबाजींनी हेच ज्ञान दिलं आहे. बाबाजींकडे तर कोणताही भेद नव्हता. भेद होता तो माझ्याकडून. यानं तर आपल्याला समस्येचा उलगडा करुन दिला आहे की, ज्या गोष्टीची चिंता आहे ती सोडून द्या. त्याच्याही पलीकडे जा. ज्या गोष्टीपासून घाबरता ती गोष्टच विसरुन जा. संतजनांनो, आपण या गोष्टी फक्त सांगतो आणि ऐकतो. मुखातून निघतात आणि कानापर्यंत राहतात. हृदयापर्यंत उतरत नाही आणि कर्मांतही येत नाही.

संतजनांनो, आज दुपारी विक्रोळीला जाण्याचा योग आला. तिथेही दास हाच उल्लेख करत होता की, काही दिवसापूर्वी घरी बसल्या बसल्या दहा मिनिटं टेलिव्हिजन सुरु केला तेव्हा भक्त प्रल्हादावर चित्रपट दाखवला जात होता. त्यात जे काही दाखवलं जात होतं ते यापूर्वीही आपण ऐकलं होतं की, भक्त प्रल्हादावर कसे कसे अत्याचार करण्यात आले. अग्निकुंडात टाकण्यात आलं, पर्वतावरुन खाली ढकलण्यात आले, हत्तीच्या समोर ठेवण्यात आले तरीही प्रल्हादाचा दृढनिश्चय ढळला नाही ही गोष्ट सर्वांनी ऐकलीच आहे. चित्रपटातील ते दृश्य पाहून त्या दिवशी मनात एक जाणीव उत्पन्न झाली की, मोठे हत्ती येत आहेत आणि त्यांच्यापुढे जमिनीवर प्रल्हाद पडला आहे. स्मितहास्य करतोय, पूर्ण विश्वासाने त्या हत्तींकडे पहतोय की हे परमेश्वरा! हे हत्ती म्हणजे तुझंच रुप आहे. हत्ती पुढे सरकत आहेत आणि प्रल्हाद स्मितहास्य करतोय, हत्ती अगदी जवळ आले आहेत आणि प्रल्हाद स्मितहास्य करतोय, हत्तींनी पाय वर उचलले तरीही प्रल्हाद स्मितहास्य करतोय आणि त्यांच्याकडे पाहतोय. आता तिथे न जाणो हत्तींचं काय झालं? कोणतं कारण घडलं? सिनेमा बनविणाऱ्यांनी असं काही दाखवलं की, जणू हत्तींना जाणीव झाली की आपल्यासमोर एखादा वाघ-सिंह बसला असून डरकाळ्या फोडत आहे आणि घाबरुन हत्ती मागे सरकले. अर्थात ही त्यांची Imagination (कल्पना) असू शकते. जे काही म्हणायचं ते म्हणा की, हत्तींनी प्रल्हादाला पायाखाली चिरडलं नाही. आता विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे की, त्यादिवशी जी जाणीव झाली ती म्हणजे हे तुझं (ईश्वराचं) कमंच होतं की हत्तींपासून प्रल्हादाचं रक्षण केलंस. त्या भक्त प्रल्हादाला पाहा की, ज्यावेळी हत्तींनी पाय वर उचलले त्यावेळीही त्याचा विश्वास दृढ होता. जेव्हा हत्ती दूरुन येताना दिसतो तेव्हा माझा विश्वास किती दृढ असतो. जोपर्यंत मी ब्रह्मज्ञानी आहे, एक भक्त आहे म्हणून ध्यान करतो की, बाबाजी! ते हत्ती इकडेच येत आहे, मी पळतो. प्रल्हादासारखं माझंही रक्षण व्हावं म्हणून इच्छा धरतो, परंतु प्रल्हादासारखा विश्वास मागत नाही. मी इच्छा बाळगतो की, मी सुध्दा अग्निकुंडात पडावं मात्र मी जळू नये. ज्या स्मितहास्यासह प्रल्हाद अग्निकुंडात गेला होता ते स्मितहास्य मात्र मी मागत नाही. कोणतीही गोष्ट एकतरफी होऊ शकत नाही. एकतर हात-पाय हलवेन नाहीतर याच्यावर (सद्गुरुवर) सोपवून मोकळा होईन. परंतु दोन दगडांवर पाय ठेवण्याचा प्रयत्न करतो. मी हुशार आहे, चलाख आहे. संतजनांनो, येथे हुशारी-चलाखी चालत नाही तर येथे चालतं ते फक्त समर्पण! त्या प्रल्हादासारखी अवस्था मागावी, त्याच्यासारखा विश्वास मागावा. त्याच्यासारखा शांत स्वभाव, त्याच्यासारखी शीतलता, त्याच्यासारखी विशालता मागावी. ठीक आहे दातार प्रभू! स्वतःचं रक्षण करण्यासाठी मला हात-पाय दिले आहेस. मी पळालोही आहे त्याबद्दल फारसं काही मोठं नाही, परंतु प्रत्येक वेळी पळूनही वाचू शकत नाही जेव्हा माझी धावपळ संपलेली असते.

क्रमशः ...

सौ. सरीता नयन तळवडेकर

(कुर्ला, मुंबई)

श्री गुरुवचनामृत

रविवार, दिनांक २२ जानेवारी, २०१२ रोजी मुंबईत आयोजित महाराष्ट्राच्या तीन दिवसीय वार्षिक निरंकारी संत समागमामध्ये लाखो भाविकांना संबोधित करताना सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी केलेल्या प्रवचनाचा मराठी अनुवाद

संतजनहो, प्रेमाने बोला - धन निरंकार जी!

संतजनहो, या मैदानांमध्ये व्यतीत होत असलेला क्षण न् क्षण आनंद प्रदान करीत आहे. श्रध्दा-भक्ती-प्रेमाने युक्त होऊन आलेले भक्त, मग ते महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून आलेले असोत, मुंबई महानगरीमध्ये वास्तव्य करणारे असोत किंवा इतर प्रांतांतून तितक्याच आवडीने व उत्साहाने हे स्वर्गीय दृश्य पाहण्यासाठी

पोहचलेले असोत (वा) आपली भक्ती दृढ करण्यासाठी आलेले असोत; सगळे मिळून असे सुंदर वातावरण निर्माण करीत आहेत. ही घडी आनंदाची आहे. कारण जिथे निराकाराचे गुणगान चाललेले असेल; प्रेम, नम्रता, निष्काम भावना आणि एकोप्याचे वर्णन होत असेल तर हेच ते पैलू आहेत जे आनंद प्रदान करतात. हे वगळता सगळ्या दुनियेचा तमाशा आहे, ज्यामध्ये शिविगाळ, निंदा-नालस्ती आणि कडवटपणाच (भरलेला) आहे. याचाच अर्थ जी वाणी सत्यावर आधारित आहे, भक्तीवर आधारित आहे त्यायोगेच भक्त आनंदीत होतात. कारण यांना सत्य प्रिय आहे, भक्ती प्रिय आहे. म्हणूनच ते यावर आधारित वाणीचा परिपूर्ण आनंद मिळवतात.

जगाची रुची वेगळ्या प्रकारची आहे. जसे दासने म्हटले की कोणी निंदा-नालस्तीमध्ये रस घेतात, निंदा श्रवण करण्याची एक लतच लागलेली असते (त्यांना), महत्वाची शंभर कामे बाजूला ठेवतील आणि कोणावर चिखलफेक होत असेल, कोणाची निंदा केली जात असेल तर तिकडे जाऊन थांबतील, त्याच्यामध्ये रस घेतील. तेव्हा जग त्यामध्ये आनंद मानते. निंदा-नालस्तीचे बोलणे ऐकायला त्यांना आवडते. कटू वचन बोलून मने दुखवतात आणि त्यांची रुची त्यांची प्रवृत्ती तशाच प्रकारची असते. त्यामुळे त्यांना भक्ती आवडत नाही किंवा भक्तीयुक्त भाव आवडत नाहीत आणि भक्तीचे पैलूही आवडत नाहीत. म्हणूनच म्हटले आहे की,

कबीर पापी भगति न भावई; हरि पूजा ना सुहाई।

पापीजनांना हरिपूजा, भक्ती, आराधना गोड वाटत नाही. त्यांच्यासाठी हे विष आहे. जे अमृत आहे त्याला ते विष मानतात. पण अमृत काय आणि विष काय हे भक्तच जाणतात. म्हणून ते अमृतपान करतात. त्यांना अमृत प्रिय आहे. अमृतच प्राणदान देणारे आहे, विष तर प्राण घेणारे, अहित करणारे असते. असे जे पैलू (भक्तीचे) आहेत त्यांना भक्तजन विशेषता देतात, त्या मार्गावर दृढतेने चालत राहतात.

जर मनुष्य सहजतेने समजू शकेल, शिकू शकेल तर पुन्हा सांगण्याची गरज पडत नाही. पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज युगानुयुगे पडलेली आहे. सत्ययुगात झाले त्याचा त्रेतायुगात पुनरुच्चार करावा लागला, त्रेतामध्ये झाले त्याचा द्वापारात पुनरुच्चार करावा लागला. ही केवळ युगांची गोष्ट नव्हे. प्रत्येक शतकात, प्रत्येक दशकात, प्रत्येक वर्षात, प्रत्येक महिन्यात, प्रत्येक आठवड्यात

आणि प्रत्येक दिवशी याचा पुनरुच्चार करावा लागत आहे. कारण हा एक महत्वाचा मुद्दा आहे, त्याचे इतके महत्व असल्याने पुन्हा पुन्हा सांगावे लागत आहे. आपण म्हणून जातो की, सांगितलं ना? बस्स! मानले तर मानले, नाही मानले तर नाही मानले. मी तर उद्यापासून याची चर्चा सुध्दा करणार नाही. परंतु भक्तजनांना ठाऊक आहे की हा असा पैलू आहे जो नाराज होऊन सोडून देण्यासारखा नाही. याचा पुनरुच्चार करावाच लागेल, वारंवार सांगावेच लागेल. आपली मुलं असतात त्यांना अभ्यासाविषयी, कामधंद्याच्या बाबतीत पुन्हा पुन्हा (आपण बोलतो). कारण आपण त्यांचे हित पाहत असतो.एकदा सांगितले, दोनदा सांगितले, तिनदा सांगितले तरीही आपण पुन्हा पुन्हा प्रयत्न करीत राहतो. आपले ऐकत नसतील तर मित्रांना सांगू की, चल तुझं (तरी) ऐकतील. पुन्हा पुन्हा (सांगतो) कारण मनामध्ये मुलाचे हित साठलेले असते, याचेच भले होईल, हाच सावरु शकेल, यामध्ये याचेच भले आहे इ. म्हणून आपण वारंवार सांगतो, पुनरुच्चार करतो. तेव्हा महापुरुषांची, संतांची ही वाणी, ही शिकवण, आदेश-उपदेश; संत तुकाराम, संत नामदेव, संत कबीर, संत रविदास, संत मिराबाई, संत मुक्ताबाई, संत बौतन्ना, संत वेमन्ना कोणाचेही असोत, स्वामी विवेकानंदांचे, समर्थ रामदासांचे, पंचसखा, चैतन्य महाप्रभु किंवा संत सूरदास यांची वाणी असो, त्या संर्वांनी जे आदेश-उपदेश दिलेले आहेत ते समस्त जगतासाठी, प्रत्येक मानवाच्या हितासाठी दिलेले आहेत. जगामध्ये लोक अहित करणे जाणतात, परंतु भक्त हितकारी असतात. म्हणूनच त्यांना वाटते की आम्ही ती उंची गाठावी जी उंची गाठण्यासाठी संतांनी-महापुरुषांनी कितीतरी जोर लावला, ती उंची गाठावी म्हणून. ते रहस्य जाणावे, ती समज प्राप्त करावी. ती समज जर लक्षात आली तर आपण तो मुक्काम गाठू शकतो. तर संत महात्म्यांनी मानवाला समजावण्याचे प्रयत्न केले आहेत. केवढ्या तरी परिभाषा आहेत. कितीतरी अर्थ काढले जातात. आपापले स्पष्टीकरण (व्याख्या) दिले जाते. परंतु संत-महापुरुष म्हणतात की, जर त्या निर्मळ (स्वरुपाला) जसे आहे तसे जाणले तर मग काम फत्ते होते. अन्यथा बुध्दी आहे ती आपले खेळ खेळत राहते. त्यांच्याजवळ कितीतरी दाखले असतात आणि कितीतरी पध्दती असतात. लाखो प्रकारे तो किंतु-परंतु करील किंवा दाखले देईल. मात्र जर रहस्य समजले तर मग किंतु-परंतु संपून जातात. मग कोणतेही दाखले, तर्कवितर्क (राहत) नाहीत आणि म्हणून आमचा उध्दार होतो.

जर भगवान येशूने सांगितले आहे तर ते केवळ बेथलहॅम किंवा जेरुसलेम किंवा त्या भागापुरते नाही किंवा मग हजरत मोहम्मद साहेब यांची वाणी कदाचित अरब देशवासियांपुरती नाही अथवा मग भगवान राम किंवा भगवान श्रीकृष्णाची वाणी केवळ उत्तर प्रदेश, अवध वा द्वारकेसाठीच नाही. श्री गुरुनानक देवजी महाराजांपासून ते श्री गुरु गोविंदसिंहजी महाराजांच्या

वाणीचे महत्व केवळ गुरमुखी-पंजाबी भाषा बोलणाऱ्यांपुरते किंवा पंजाबवासियांसाठी किंवा उत्तर भारतीयांसाठी नाही आणि संत तुकारामजींची वाणी, संत नामदेवांची वाणी देखील केवळ मराठी भाषिक किंवा महाराष्ट्रवासियांसाठी नाही. ही समस्त वाणी प्रत्येक मानवासाठी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे त्यावर फूल चढविणे (सर्वोपरी स्वीकार करणे) प्रत्येकाचे कर्तव्य बनते. फूल चढविण्याचा अर्थ केवळ ती वाणी श्रवण करुन त्यात मंत्रमुग्ध होणे किंवा वाहवा करणे नव्हे तर त्या वाणीला जसेच्या तसे आपल्या जीवनात स्थान देणे, मानणे होय. संत-महात्म्यांची वाणी हाकारुन सांगत आहे की, जनहो! तुम्ही या प्रभु-परमात्म्याशी, या निराकार ईश्वराशी आपल्या मनाचे नाते जोडा. हा परमात्मा जो अनंत आहे, कणकणवासी आहे, अणुरेणूत आहे, ज्याचा आदि-अंत नाही, ज्याचा मध्य नाही, जो सर्वत्र समान आहे, जो वाढत-घटत नाही. तेव्हा हेच निराकार असे परमअस्तित्व आहे ज्याच्याशी प्रत्येकाने नाते जोडायचे असून आपल्या आत्म्याला मोक्ष प्रदान करायचा आहे आणि त्याबरोबरच आपला जीवनप्रवासही सुंदर प्रकारे करायचा आहे. जे आपले नाते जोडतात, जागृत होतात, बोध प्राप्त करतात ते तरुन जातात. अन्यथा भवसागरात बुडणे निश्चित होते. कारण भवसागरातून तरुन जाण्यासाठी विद्या, दौलत, ताकद किंवा सौंदर्य यापैकी कोणतीच गोष्ट आधार बनत नाही. ब्रह्मज्ञानीच केवळ तरुन जाण्याचे साधन बनतात. दुनियेमध्ये आपण अनेक प्रकारची कामे करतो. त्यामध्ये कधी काय साधन बनते तर कधी काय साधन बनते. आपण बऱ्याचदा म्हणतो की, तो मनुष्य भेटला आणि त्याची पुढे ओळख होती व त्या ओळखीमुळे माझे काम झाले किंवा फार उच्चशिक्षित, त्या विषयातील तज्ञ शिक्षक मला भेटला म्हणून मी ती विद्या ग्रहण करु शकलो, किंवा चांगले प्रदर्शन (perform) करु शकलो. एक उत्तम प्रशिक्षक मिळाला ज्याने त्या विशिष्ट खेळातील बारकावे माझ्या बुध्दीत भरवले, इतकी कला शिकवली, (आज) जर मी त्या खेळात चांगले प्रदर्शन करीत असेल तर त्यामध्ये ते साधन बनले.

अशाच प्रकारे एका परमसत्याशी नाते जोडायचे असेल तर युगानुयुगे जे माध्यम सांगितले गेले आहे की,

गुरु बिनु भव निधि तरइ न कोई,
जौ बिरंचि संकरसम होई।

गुरुशिवाय भवनिधीतून पलीकडे जाणे शक्य नाही. ब्रह्मा असो वा शंकर असोत, त्यांनाही या साधनाची गरज आहे. रामाचे वर्णन करताना वशिष्ठजींचा उल्लेख का येतो? राम तर भगवान आहे, भगवंताचा दर्जा आपण त्यांना देतो, आमच्या मनात त्यांच्याबद्दल अशीच श्रध्दा-भावना आहे, आपण त्यांची पूजा-अर्चा करतो. एवढा श्रेष्ठ दर्जा आपण त्यांना देतो. मग वशिष्ठजींचे नांवच इतिहासाच्या पृष्ठांवर यायला नको होते. परंतु जे भगवान आहेत तेही गुरुचा आश्रय घेतात. तेव्हा गुरु नेहमीच होते आणि तेच या भवसागरातून पार नेतात. जर आपण श्रध्देने स्वत:ला समर्पित करु तर आमच्या पदरात हा खजिना, ही जागृती येते. हा प्रकाश आमच्या मनाला व आत्म्याला प्राप्त होतो आणि तोच आम्हाला भवपार करतो. अन्यथा बेड्याच बेड्या आहेत.



नावेलाही बेडी म्हटले जाते, जिच्यामध्ये बसल्यानंतर पैलतिरावर जाता येते. पण एक बेडी अशी असते तिला साखळी म्हणतात. आमच्या पायाला ती (साखळी) बांधली गेली आणि ब्रह्मज्ञानींची संगत आपल्याला मिळाली नाही तर आपण त्यामध्ये अडकून पडतो. म्हणूनच वारंवार सांगितले जातं की, आपण या माध्यमाचा अंगिकार करुन ज्याची प्राप्ती अशक्य मानून आपण चालतो त्या परमअस्तित्वाचा बोध प्राप्त करावा. तेव्हा मग हे अशक्य असलेले शक्य होते. जसे आणखीही म्हटले आहे की,

दुर्लभ काज सुलभ करि पावा।

ज्याला आपण दुर्लभ मानतो ते सुलभ होऊन जाते. तसे साधन मिळाले म्हणून सुलभ झाले. ज्याला असा बोध प्राप्त आहे त्याच्याशी नाते जोडले तेव्हा ते अवघड होते ते सोपे झाले. म्हणूनच महापुरुष निमंत्रण देतात की,

करउ बेनंती सुनहु मेरे मीता संत टहल की बेला,
ईहां खांटि चलहु हरि लाहा आगै बसनु सुहेला।

याचे वर्णन करीत असतानाच आपण जीवन प्रवासही करीत आहोत. इहलोकीच्या आयुष्यात आपण जेवढा काळ व्यतीत करीत आहोत तो प्रवासही आम्ही सुंदर बनवायचा आहे आणि त्यासाठीही याच जागृतीची गरज आहे. त्यादृष्टीनेही जीवनात संत-महात्मे महत्वपूर्ण ठरतात. महात्म्यांनी सत्याचे दर्शन करण्यावर भर दिला. आत्म्याच्या कल्याणावर जोर दिला तशाच प्रकारे अशी मती धारण करण्यास सांगितले ज्यायोगे इहलोकही सुखकर बनतो. तेव्हा इहलोक आणि परलोक दोन्हीही सावरले जावेत असा महापुरुषांचा प्रयत्न राहिला आहे. केवळ एक नव्हे, केवळ आत्म्याच्या कल्याणाची बाब किंवा इहलोकीच्या कल्याणाची बाब सांगितलेली नाही तर उभयलोकांची बाजी जिंकण्याची गोष्ट सांगितली आहे. इहलोक सावरण्यावरही महापुरुषांनी फार मोठा भर दिलेला आहे. इहलोक ज्याला आपण संसार म्हणतो, इहलोक म्हणतो, माया म्हणतो; हा जो काही समस्त पसारा आहे तो आमच्या इहलोकाशी जोडलेला आहे. तेव्हा हा इहलोकीचा जो पैलू आहे त्याला सजविण्या-सवरण्यावर महापुरुष भर देत आहेत. याचे फार मोठे महत्व आहे. कारण या जगतामध्ये जे काही घडत आहे, जो हा सर्व पसारा आहे तो आमच्यासाठी फार महत्वाचा आहे. म्हणून या संसाराला तशाप्रकारे निभावून नेण्यासाठी, हा (जीवन) प्रवास सुंदर बनविण्यासाठी आम्हाला निश्चितच त्या मार्गाने चालावे लागेल जो संत-महात्म्यांचा मार्ग आहे. तो सहनशीलता, प्रेम, करुणा दयेचा मार्ग, तो प्रेमाला आणखी मजबूत करण्याचा मार्ग! प्रेमाचे जग वसविण्याची गोष्ट (आहे), जर आपण प्रेमाशिवाय इहलोकीचा प्रवास केला तर तो सुंदर होणार नाही. कारण-

प्यार सजाता है गुलशन को, और नफरत वीरान करे।

प्रेम सजवते आणि द्वेष वैराण बनवते. आज आणि काल सुध्दा कवी सज्जनांनी यावर आधारित वचने प्रस्तुत केली. जर मनात प्रेम असेल तरच मानव मानवाच्या कामी येईल. जर प्रेमच नसेल तर मग शोषण करणारा, नुकसान करणारा बनेल.तेव्हा ह्रदयात प्रेम असणे गरजेचे आहे. परंतु आज या प्रेमाचीच वानवा आहे. प्रेम मिळत नाही. परक्यांची तर गोष्ट सोडाच पण आप्तजनांकडून प्रेम



मिळेनासे झाले आहे. प्रत्येकजण प्रेमाचा डांगोरा पिटत आहे यावरुन जीवनात प्रेमाचे केवढे तरी महत्व आहे (हे दिसून येते). बऱ्याचदा म्हटले जाते की, हे बंधू, मला पंचपक्वान्ने घालू नकोस, माझ्या हातावर पैसेही ठेवू नकोस, प्रेमाचे दोन शब्दच मला पुरेसे आहेत, माझ्यासाठी तेच फार महत्वाचे आहेत. तेव्हा प्रेम कमी होत चालल्याने आपला इहलोक बिघडत चालला आहे. नुकसान होत आहे. कारण प्रेम सोडून द्वेषाचा अंगिकार करीत चालले आहेत. संकुचित बनत चालले आहेत. विशालतेचा त्याग करतात. पदोपदी तनाचा, धनाचा, विद्वतेचा, सत्तेचा, ताकदीचा अभिमान (करतात). भक्त महापुरुष वारंवार हे सांगत आले आहेत. परंतु मनुष्य समजायला तयार नाही. ते अभिमानही करतील, मनेही दुखवतील, आपल्या करणीपासून परावृत्त होणार नाहीत. कोणत्या ना कोणत्या रुपात ते आघात करणारच! जशी ती म्हण आठवते की, कोणी एक मनुष्य फार निराश होता. म्हणू लागला की,मी फारच कुरुप आहे. ज्याला तो सांगत होता तो म्हणाला Never think that you are ugly just think that you are a beautiful monkey. (अर्थात् तू कुरुप आहेस असे समजू नकोस तर असे समज की तू एक सुंदर माकड आहेस). यातून तो त्याचे मन राखत आहे की त्याला दुखवत आहे? पहिला शब्द ऐकून तो खूश झाला असेल की, स्वतःला कुरुप मानू नकोस (पण नंतर) त्याला म्हटले की, तू स्वतःला सुंदर माकड समज. तेव्हा अशाप्रकारे लोक कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने इजा पोहचवतच असतात. लोकांची अशी वर्तणूकच जगाची दुर्दशा करीत आहे. तेव्हा संत महात्मे यासाठीच वारंवार हा धडा देत असतात, वारंवार ही शिकवण देत असतात जेणेकरुन मानवाने योग्य मार्गाने चालावे, प्रेमभावाने युक्त व्हावे. परंतु मानव अहंभावामुळे पदोपदी अभिमान बाळगतो. स्वतःला विद्वान आणि इतरांना मूर्ख समजतात. कुठे दौलतीचा माज आहे की, बस्स माझ्याकडे इतकी दौलत आहे, मी कोणाला काय लेखतो? कितीतरी गोष्टींवर अभिमान करतो. परंतु महापुरुष सांगतात, अभिमान करु नये, विनम्रतेने या जीवनाचा प्रवास पूर्ण करायचा आहे. बऱ्याचदा पहायला मिळते की वादळ येते आणि त्यात मोठ-मोठी झाडे

जगाची रुची वेगळ्या प्रकारची आहे. जसे दासने म्हटले की कोणी निंदा-नालस्तीमध्ये रस घेतात, निंदा श्रवण करण्याची एक लतच लागलेली असते (त्यांना). शंभर महत्वाची कामे बाजूला ठेवतील आणि कोणावर विखलफेक होत असेल, कोणाची निंदा केली जात असेल तर तिकडे जाऊन थांबतील, त्याच्यामध्ये रस घेतील. तेव्हा जग त्यामध्ये आनंद मानते. निंदा-नालस्तीचे बोलणे ऐकायला त्यांना आवडते. कटू वचन बोलून मने दुखवतात आणि त्यांची रुची त्यांची प्रवृत्ती तशाच प्रकारची असते. त्यामुळे त्यांना भक्ती आवडत नाही किंवा भक्तीयुक्त भाव आवडत नाहीत आणि भक्तीचे पैलूही आवडत नाहीत.

❖ ❖ ❖

जर मनुष्य सहजतेने समजू शकेल, शिकू शकेल तर पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज पडत नाही. पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज युगानुयुगे पडलेली आहे. सत्ययुगात झाले त्याचा त्रेतायुगात पुनरुच्चार करावा लागला, त्रेतामध्ये झाले त्याचा द्वापारात पुनरुच्चार करावा लागला. ही केवळ युगांची गोष्ट नव्हे. प्रत्येक शतकात, प्रत्येक दशकात, प्रत्येक वर्षात, प्रत्येक महिन्यात, प्रत्येक आठवड्यात आणि प्रत्येक दिवशी याचा पुनरुच्चार करावा लागत आहे. कारण हा एक महत्वाचा मुद्दा आहे, त्याचे इतके महत्व असल्याने पुन्हा पुन्हा सांगावे लागत आहे. आपण म्हणून जातो की, सांगितलं ना? बस्स! मानले तर मानले, नाही मानले तर नाही मानले.

जमिनदोस्त होतात. परंतु वादळ शांत झाल्यावर आपण पहा की, लहान लहान गवत आपल्या जागेवर टिकून असते. कोणतेही वादळ त्याला उखडू शकत नाही, कारण ते जमिनीबरोबर आहे, त्याच्यामध्ये अहंभाव नाही. जे अहंकार करतात ते स्वतःच्या खुजेपणाचा दाखला स्वतःच देत असतात. जेव्हा ते मी मी करीत असतात तेव्हा ते सांगत असतात की पहा पहा आम्ही किती लहान आहोत. त्या शब्दांचा वापर करीत नाहीत परंतु ज्या पध्दतीचे दर्शन घडवित आहेत त्यावरुन हे प्रमाणित होते की ते फार लहान आहेत. ही उंची त्यांना आकळलेलीच नाही. उंची काय असते आणि उंच कसे बनले जाते (हे त्यांना ठाऊकच नसते). हे तर संत-महात्म्यांनी सांगितले. परंतु मनुष्य असा कमनशिबी की, महापुरुषांनी प्रत्येक युगात सांगितले तरीही तो मार्ग अंगिकारत नाहीत. त्यांनी सांगितले की, जर तू उंच बनू इच्छित असशील तर तू स्वतःला मिटवून टाक, दासभावनेने युक्त हो, मी-मी सोडून दे, या तू-तू मध्ये विलीन करुन टाक आपल्या 'मी' ला. या 'मी' ला परमात्मारुपी 'तू' मध्ये समर्पित कर.

तू कर्ता है जगत का, तू सबका आधार।

'तू' ला महत्व द्यायला सुरुवात कर. मग तुझाही दर्जा तोच होईल जो या 'तू'चा आहे. जसे नदी-नाले सागराला जाऊन मिळतात तेव्हा त्यांनाही सागराचाच दर्जा प्राप्त होतो, ते सागराचेच बनून जातात. मात्र जर ते आपल्या दोन किनाऱ्यांच्यामध्येच सीमित राहिले असते तर त्यांना सागराचा दर्जा मिळाला नसता. जेव्हा त्यांनी स्वतःचे अस्तित्व संपवले तेव्हा त्यांना सागराचा दर्जा मिळाला. स्वतःचे अस्तित्व मिटवले. ज्या दोन किनाऱ्यांमुळे माझे एक अस्तित्व होते त्या किनाऱ्यांच्या बाहेर आले, आता त्याच्यामध्येच सामावले गेले जो व्यापक आहे, विशाल आहे. म्हणूनच आता त्याचेच रुप बनलं आहेत. आजही हाच प्रयत्न होत आहे की, मानवाने ही बाब समजावी. जेवढ्या लवकर समजतील तेवढ्या लवकर यांचे कल्याण होईल.

महापुरुष संतजन messengers च्या रुपात आहेत. आणखीही आजकाल तंत्रज्ञानामुळे मोठ-मोठे संदेशवाहक लोकप्रिय झालेले आहेत, त्यांचा वापर केला जात आहे. कुठे ब्लॅकबेरीची मॅसेंजर आहेत, कुठे याहूचे मॅसेंजर आहेत. या मॅसेंजरकडे फार लक्ष जाते. एका एका मिनिटाने आपण स्क्रीनकडे वळतो. सुरुवातीला संगणक बनले. डेस्कटॉपसमोर बसून रहा. मग लॅपटॉप आले चालता-फिरता मॅसेंजरचा उपयोग करा आणि मग त्याचा आकार लहान केला गेला. मोबाईलमध्ये त्या मॅसेंजर (संदेशवाहक)ला भरले. तर या मॅसेंजरला आपण किती महत्व देतो. परंतु परमात्म्याचे संदेशवाहक (messangers) युगानुयुगे आले आहेत आणि तेही काहीतरी सांगत आहेत. त्यांनी काय सांगितले तिकडे कधी ध्यान दिले नाही. जेवढे मोबाईल किंवा संगणकाच्या स्क्रीनवर आपले ध्यान जाते तेवढी फ्रिक्वेन्सी (वारंवार) परमात्म्याच्या संदेशवाहकाने काय सांगितले आहे तिकडे जाते का? त्यांनी काय सांगितले त्याच्याकडेही लक्ष द्यावे. तेव्हा अगोदर कबीरजींसारख्या संतांनी उदाहरणे दिली की-

सुमिरन की सुध यों ज्यों सुरती सुत मांहि।

ज्याप्रमाणे गायीचे ध्यान वारंवार वासराकडे जाते त्याचप्रमाणे आपण सुमिरणकडे ध्यान द्यावे. तर तेव्हा हे तंत्रज्ञान नव्हते. आता तर असे वाटते, अशी प्रार्थना केली जाईल की, हे प्रभो! माझ्या मोबाईलमध्ये निवास कर. कारण मोबाईलमध्येच राहिलास तर वारंवार माझे त्याकडे लक्ष जाईल आणि तुझीही आठवण येईल. सांगण्याचे तात्पर्य दास जे सांगत होता की, युगानुयुगे परमात्म्याचे संदेशवाहक जो संदेश श्रवण करुन आणि मानून त्यावर जे चालतात त्यांचा उध्दार होतो. परंतु असेही काही हूडमती असतात जे दुर्लक्षच करतात. न मानण्याची त्यांची प्रवृत्ती नेहमीचीच आहे. जसे अगोदरही दासने म्हटले की कोणीतरी सांगितले की जर तू एकदा चूक करशील तेव्हा तुला इतका दंड, दुसऱ्यांदा करशील तर १००० रुपये दंड. प्रत्येक वेळी चूक करशील तेव्हा त्याचा दंड भरावा लागेल. तर एकजण मध्येच म्हणाला की, सिझन पास कितीला मिळेल? एकदाच एक सिझन पास घेऊन टाकू. कारण मी सुधारणार नाही. तेव्हा अशी हूडमती, अशी प्रवृत्ती मानवाची राहिलेली आहे आणि त्यांच्यासाठी ते कोणत्या प्रांतातील आहेत, कोणत्या

देशातील आहेत, कोणत्या पैगंबराला मानणारे आहेत, कोणता धर्मग्रंथ वाचतात याला काहीच महत्व नाही. अंधार आणि प्रकाश ही दोन्ही रुपे सदोदित चालत आली आहेत. महापुरुष संतजन सांगतात की हे मानवा! तू त्यांचेच अनुकरण कर ज्यांचे अनुकरण करण्याने पूर्वी तू भवपार झालास आणि आताही तू अशा सुंदर भावांनी युक्त होऊन जीवन प्रवास करीत जा. नम्रतेने जग, मने दुखवू नकोस. अनेकप्रकारे मने दुखावली जातात. वाणीने मने दुखावली जातात, कृतीने मने दुखावली जातात, इजा पोहचवली जाते, आघात केले जातात.

शेवटी ती गोष्ट आठवली की, एक पती आपल्या पत्नीला म्हणतो की, लवकर-लवकर जेवण वाढ. मला जायचे आहे. कुत्र्यांची शर्यत आहे. असे म्हटल्यावर पत्नी म्हणाली की चालता येत नाही आणि कुत्र्यांच्या शर्यतीत कसे पळणार? तो स्वत:हून सांगत होता की, कुत्र्यांची शर्यत आहे आणि मला पहायची आहे. मात्र पत्नी म्हणत आहे की, तू कुत्रा आहेस, तुला चालता येत नाही आणि कुत्र्यांच्या शर्यतीत काय भाग घेणार? सांगण्याचे तात्पर्य लोक दुसऱ्याचे मन दुखवण्यात रत असतात. पण ते धन्य होत जे इतरांच्या हृदयाला सुखावतात, पडलेल्याला उठवतात, छातीला कवटाळतात, गोड वाणी बोलतात, नम्रपणे या जीवनाचा प्रवास करतात, स्वत:चे आणि इतरांचे जीवन प्रेमाने सजवतात आणि या धरतीला सुंदर रुप देतात. दातार कृपा करो की प्रत्येकाच्या मनात, प्रत्येकाच्या जीवनात या परमअस्तित्वाची, गुरु-पीर-पैगंबराच्या महतीची जाणीव कायम रहावी. कारण या परमात्म्यामुळे, या सत्यामुळेच हा सगळा खेळ, हे सर्वकाही अस्तित्वात आहे.

चाले हे शरीर कोणाचिया सत्ते।
कोण बोलविते हरिविण।

हे शरीर कार्यरत आहे, प्रकृती कार्यान्वित आहे ती परमात्मारुपी अस्तित्वामुळे. हाच परमात्मा, हाच निराकार, हाच अकालपुरख, हाच विठ्ठल आहे. याचेच गुणगान, याचेच वर्णन महापुरुषांनी-संतांनी सदोदित केले आहे. तेव्हा प्रत्येकाच्या जीवनात यालाच प्राधान्य मिळत राहो. परवापासून मुंबई महानगरीच्या ऐरोली विभागात चाललेल्या या संत समागमाचा हाच अभिप्राय होता. या मैदानावर उपस्थित होऊन हेच लक्ष्य गाठण्यासाठी हे आयोजन झाले आणि आपण याचा भरपूर आनंद घेतला आहे. फारच सुंदर प्रकारे सर्वांनी स्वत:ला प्रस्तुत केले आहे. त्यासाठी सर्व अभिनंदनास पात्र आहेत. ज्यांनी ज्यांनी सहयोग दिला आहे, अनेक यंत्रणा आहेत, अनेक असे सज्जन आहेत ज्यांनी या परोपकाराच्या कार्यात (सहयोग दिला आहे.) एक-एक भक्त, एक-एक सेवादलाचा जवान, अधिकारी आणि प्रबंधक महापुरुष यांनी कशाप्रकारे इतक्या सुंदर तऱ्हेने हे सारे कार्य पार पाडले आहे, समस्त साध संगतीने स्वत:ला निभावून नेले आहे. तर खरोखर त्यामुळेच हे सौंदर्य आणि त्यामुळेच हे आनंदी वातावरण! तेव्हा दास आणखी काही न बोलता याच शब्दांद्वारे आपली आज्ञा घेऊ इच्छितो.

संतजनहो, धन निरंकार।

प्रस्तुति : सविता चौधरी
मराठी रुपांतर : श्री. स.वि.लव्हटे

'मानव एकता'

अनेकतेत एकतेचे प्रतीक म्हणून निरंकारी मिशनला संबोधले जाते. आज मिशनमध्ये प्रत्यक्ष पहायला मिळते की, जात, धर्म, भाषा, प्रांतातील लोक एकत्र येऊन गुण्यागोविंदाने एकाच परिवारातील सदस्याप्रमाणे राहतात. हिंदू, मुस्लीम, सिख, ईसाई या भिंती पाडून प्रेम, नम्रता, दया, करुणा या मानवीय गुणांचा स्वीकार करुन जगणाऱ्या महान संतांचे दर्शन निरंकारी परिवारात होते. अनेकतेमध्ये एकतेचे रुप दिसणे हे फार कठीण आहे. जरी सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सांगतात की, आज जग वैर, ईर्षा, नफरत आणि द्वेषाच्या आगीत होरपळत आहे. या दूषित वातावरणाला सुंदरतेत परावर्तीत करणे म्हणजे गुरु, पीर, पैगंबर, साधू, संत, ऋषी मुनीं यांच्या समोर असणारे एक भले मोठे आव्हान (challenge) आहे. कारण ज्यांनी ज्यांनी या धरतीला सुंदर रुप प्रदान करण्याचे कार्य केले त्या सर्वांचा अज्ञानी लोकांनी छळ केला. याची आपल्यासमोर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांच्यासारखी कितीतरी उदाहरणे आहेत. सांगण्याचा भावार्थ हाच की, आज माणसातील माणूस हरवलेला आहे. युगायुगापासून साधु संतांनी 'मानवता हाच खरा धर्म' हा जनकल्याणाचा संदेश वारंवार दिला. समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सांगतात की, मानवात मानवीय गुणांचा पाया मजबूत राहिला तरच धर्म मजबूत राहील आणि धर्म मजबूत राहिला तरच मानवता मजबूत राहील. म्हणजेच मानवतेला कायम-दायम टिकविण्यासाठी प्रेम, नम्रता, सहनशीलता सारख्या मानवीय गुणांचा स्वीकार करावाच लागणार. मानवता आणि मानव एकता यावर साधु संत, ऋषीमुनी यांनी जोर दिला. 'माणसा तू माणूस बन' ही शिकवण माणसाला वारंवार दिली. एकच गोष्ट वारंवार संताना सांगावी लागली आणि सांगावी लागते याचा अर्थ मानवात काहीतरी कमतरता आहे. बाह्यांगाने दिसणारा मानव खरा मनुष्य आहे का? याची पारख मानवी सद्गुणांनी होते. पडताळा करुन पाहिल्यास निदर्शनास येते की, Human Value म्हणजे मानवीय गुणांचा मानवात लवलेशही नाही. म्हणूनच साधुसंतांनी आणि समयाच्या सद्गुरुने वारंवार 'माणसा तू माणूस बन' उपदेश मानवाला केला.

निरंकारी राजमाताजी देखील आपल्या विचारात सांगतात की, 'कोणत्याही पशु-पक्ष्यांना म्हटलं जात नाही की घोड्या तू घोडा बन किंवा पोपटा तू पोपट बन. जेव्हाही म्हटलं जातं ते मनुष्यालाच की 'माणसा तू माणूस बन.' धरतीवरचा प्रत्येक माणूस जर माणसासारखा वागला तर नक्कीच ही सारी धरती स्वर्गमय होऊन जाईल. जिकडे-तिकडे आनंदी आनंद, सुखी जीवनाचे रहस्य कशात आहे हे त्यावेळेस माणसाला कळेल. सद्गुरु बाबाजी वारंवार आपल्या विचारात सांगतात की, प्रेमाने बोला, प्रेमाने रहा, शुध्द आचरण ठेवा. मन पवित्र ठेवा, मनामध्ये कोणाबद्दल तिरस्कार, वाईट भावना आणू नका, कोणाचे मन दुखवू नका, दुसऱ्याचा हक्क अधिकार हिरावून घेऊ नका. धनदौलतीसाठी झगडा, वैर करु नका. जातीय वाद, प्रांतवाद करु नका. सर्वजण मिळून मिसळून, एकजुटीने रहा. आज काळाची गरज आहे ती सद्गुरु बाबाजींचे सर्व आदेश-उपदेश आचरणात आणण्याची.

जेव्हा जेव्हा दासी सद्गुरुंचे पावन विचार श्रवण करते तेव्हा तेव्हा विचार करते, ती सर्व वचने आत्मसात करण्याचा. माझ्या क्षणभंगुर जीवनाला त्या अनमोल वचनांनी सजवण्याचा. मानव एकतेवर लिहिता लिहिता दुसऱ्याच विषयात हस्तक्षेप करत आहे. पण आज गरज आहे ती स्वतःच्या मनाला सावरण्याची. 'मनुर्भव' म्हणजे नेमके काय? ते ओळखण्याची. प्रत्येक जणाने माणसासारखा सद्व्यवहार केला तर माणुसकीला काळीमा लागणार नाही. संत निरंकारी मिशनचे तिसरे सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी यांची अमानुषपणे ज्यांनी हत्या केली त्यांनी तर जणू मानवतेलाच काळीमा फासला. मानवता शिकवणाऱ्या देवदूतालाच मानवाने धडा शिकवण्याची चूक केली. पण निरंकारी मिशन हे सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी यांच्या देहापूरतेच सीमित नव्हते हे आज त्या अज्ञानींना कळले असणारच. यावर **कवी**

(पान २७ वर)

अनुभवाचे बोल

जेव्हा तोंड उघडू तेव्हा गोडच बोलू

किसी दिल का शीशा न तोड दे,
कोई साथी साथ न छोड दे
कोई बात जब भी कहा करो
तो सोच समझकर कहा करो

'आंधळ्याचा पुत्र आंधळा'....फक्त तीन शब्द! परिणाम ...महाभारताचं एक भयंकर युध्द! इंद्रप्रस्थ नगरीत पांडवांचा नवीन महाल बघण्यासाठी दुर्योधन आलेला असताना द्रौपदीने हे तीन शब्द उच्चारले होते. महालाची रचना अशाप्रकारे करण्यात आली होती की, ती मायावी रचना डोळ्यांना फसविणारी आणि आश्चर्यचकित करणारी होती. पाण्यानं भरलेलं लहानसं तळं सपाट चिरेबंदी जमिनीप्रमाणे (फर्शीप्रमाणे) दिसायचं आणि जिथे पक्की चिरेबंदी जमिन दिसायची तिथे वास्तवात पाण्यानं भरलेलं तळं होतं. ही गोष्ट दुर्योधनाला माहीत नव्हती. बिछाईत (फर्शी) समजून दुर्योधनानं आपली पावलं टाकताच तो सरळ पाण्यात पडला आणि त्याचे कपडे ओले झाले. त्यावेळी द्रौपदीने हास्य प्रवृत्तीनं 'आंधळ्याचा पुत्र आंधळा' हे शब्द उच्चारले. दुर्योधनाचे वडिल राजा धृतराष्ट्र जन्मापासूनच नेत्रहीन होते. द्रौपदीने टोमणा मारुन त्यांच्या नेत्रहीनपणाची टिंगल उडवली. ही गोष्ट दुर्योधनाच्या जिव्हारी लागली आणि या अपमानाचा सूड घेण्यासाठी त्याने पांडवांविरुध्द युध्दाचा कट रचला.

कोणताही विचार न करता उच्चारलेल्या शब्दांचा इतका भयंकर परिणाम इतिहासात आणखी कुठे पाहायला मिळाला नसता. पाहा, तलवारीच्या घावाने शरीरावर जखम होते मात्र कालांतराने ती जखम भरुनही निघते. जिभेतून उच्चारलेल्या शब्दांचे घाव कोमल हृदयाला जखम करुन जातात. ती जखम भरुन तर येत नाही उलट वर्षानुवर्षे ठसठसत राहते. तात्पर्य हेच की, आपण अशा भाषेचा (शब्दांचा) वापर करु नये जेणेकरुन एखाद्याच्या हृदयाला ठेच लागेल. याबाबत निरंकारी राजमाताजी म्हणतात, "**गुरसिख मस्करी करताना कधीही वायफळ शब्द बोलत नाहीत, तर आपलं प्रत्येक वाक्य विचार करुनच बोलतात.**"

सत्य तर हेच आहे की, मनुष्याला बालपणात चांगल्या पध्दतीने भाषा बोलण्या-शिकवण्यासाठी दोन-तीन वर्षे लागतात मात्र काय बोलायचं आहे, कसं बोलायचं आहे, काय बोलायचं नाही हे शिकायला आयुष्य घालवावं लागतं. "**बुध्दिमान व्यक्ती बोलतात, कारण बोलण्यासाठी त्यांच्या जवळ काही तरी असतं. मूर्ख बोलतात , कारण त्यांना फक्त काही बोलायचच असतं**" हे शब्द महान तत्वज्ञानी प्लेटो यांनी काही शतकांपूर्वी उच्चारले होते, जे आजही तितकेच प्रभावशाली आहेत जितके ते त्या काळातही प्रभावशाली होते.

पता अनजान के किरदार का भी पल में चलता है
कि लहजा गुफ्तगु का भेद सारे खोल जाता है

प्रेमाने भरलेले शब्द ऐकणाऱ्याला आत्मिक आनंद प्रदान करतात. भाषा मराठी असो किंवा हिंदी; आपण काय बोलतो आणि कसं बोलतो याला फारच महत्त्व असतं. जो आपल्या मनातील भाव कोणाचंही हृदय न दुखवता दुसऱ्यांच्या समोर ठेवण्याची कला जाणतो, तोच सर्वांच्या हृदयात आपलं स्थान निर्माण करतो. त्याच्या तोंडातून बाहेर पडलेला एक-एक शब्द ऐकणाऱ्याच्या हृदयाला मन:शांती प्रदान करतो. कावळा आणि कोकिळा या दोघांचाही काळा रंग असतो, पण जोपर्यंत बोलत नाहीत तोपर्यंत कावळा कोणता आहे आणि कोकीळा कोणती आहे हे माहीत होत नाही.

कटु वचन मत बोलिए रहो भले ही मौन
कौओं का संसार में आदर करता कौन?

लहान मुलं वहीवर पेन्सिलनं लिहितात. चुकीचा शब्द लिहिल्यास ताबडतोब खोडरबराने खोडून टाकतात आणि चुकीची दुरुस्ती करतात, परंतु तोंडातून बाहेर

पडणाऱ्या शब्दांसाठी ही सुविधा मात्र उपलब्ध नाही. जोपर्यंत शब्द तोंडात आहेत तोपर्यंत ते आपले असतात आणि जेव्हा ते तोंडातून बाहेर पडतात तेव्हा ते परके होतात. मग लाख प्रयत्न केले तरी त्यात कोणताही बदल होऊ शकत नाही. म्हणून एक-एक शब्द सांभाळून बोलण्याची गरज आहे.

बिचाऱ्या जिभेचा मात्र कोणताही दोष नाही. ती तर मांसाचा एक तुकडा आहे. मग ती गोड किंवा कडू कशी होऊ शकेल? आपल्या मनातील जे भाव जिभेद्वारा तोंडातून बाहेर पडतात ते गोड किंवा कडू असतात. बस या मनातील भाव गोड व्हावेत, मग तोंडातून आपोआप गोड शब्द देखील बाहेर पडतील.

युगप्रवर्तक सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांनी २६ एप्रिल १९७५ मध्ये लुधियाना सभासंमेलनात सांगितले होते, **"आपल्या एखाद्या महापुरुषाच्या मुखातून कोणतीही अशी गोष्ट निघू नये जेणेकरुन एखाद्याचं मन दुखावेल या गोष्टीकडे आपल्याला विशेष ध्यान देण्याची गरज आहे. म्हणून प्रत्येक वेळी प्रत्येक बोलणाऱ्याचा हाच प्रयत्न असायला हवा की, त्याच्या मुखातून तोलून-मापून शब्दच निघावेत आणि बोलण्याच्या पध्दतीत इतका गोडवा भरलेला असावा की, ऐकणाराही प्रभावित होऊ शकेल."**

जेव्हा देखील आपण तोंड उघडू तेव्हा गोडच गोड बोलू अशी सद्गुरु दातारनं कृपा करावी. संपूर्ण अवतार वाणीतील ३१४व्या पदात लिहिले आहे की...मधुर वाणी आणि नम्रता सद्गुरु हेची शिकविती.

श्री. विकास अरोरा
(रेवाडी, हरियाणा)
marathivikas@rediff.com

~~~~~~~~~~

'मानव एकता' ...(पान २५ वरुन)

बेकलजी म्हणतात की,

गुरबचन एक मिशन था, जीने का एक अंदाज था
तान बस उल्फत की छेडे, गुरबचन वो साज था
उसकी दी नजरो से देखेंगे, तो पाएँगे सभी,
सद्गुरु हरदेव बनके जिन्दा है, वो आज भी।

किती सुंदर रचनेद्वारा बेकलजी यांनी स्पष्ट केले की, बाबा गुरबचनसिंहजी आजही या धरतीवर संचार करत आहेत ते सद्गुरु हरदेवसिंहजी यांच्या रुपात. सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी हे आपल्या सद्गुरुंनाच नव्हे तर आपल्या वडिलांनाही पारखे झाले होते. तरीही त्यांनी पिता-पुत्र या नात्याला बाजूला ठेवून गुरु-शिष्य या नात्याला श्रेष्ठता दिली. 'खून का बदला खून' अशी विचारधारा असणाऱ्यांना शांत करुन मायेचा हात फिरवून धरतीला धारातिर्थ होण्यापासून वाचविले. त्यांनी भक्तांना समजवले, जर असा सूड घेतला तर बाबा गुरबचनसिंहजी हा दिवा हिंसाचाराच्या युध्दात विझून जाईल.

ऑक्टोबर १९८६ मध्ये रक्तदान महाअभियानाचा शुभारंभ बाबा हरदेवसिंहजी यांनी केला. २४ एप्रिल हा बाबा गुरबचनसिंहजी आणि मिशनचे कर्मयोगी सेवादार चाचा प्रतापसिंहजी यांचा बलिदान अथवा श्रध्दांजली दिवस न मानता 'मानव एकता दिवस' म्हणून घोषित करण्यात आला.

चला मग जर आपल्याला बाबा गुरबचनसिंहजी आणि चाचा प्रतापसिंहजी यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली अर्पण करायची असेल तर त्यांच्या अनमोल, पावन वचनांवर चालून आपल्या जीवनात सुख, समाधान, शांती प्राप्त करुया हीच खऱ्या अर्थाने त्यांना वाहिलेली श्रध्दांजली असेल.

कु. सोनाली गुलाब चव्हाण
गोडोली, सातारा

~~~~~~~~~~

जीवनात असावी गुरुमर्यादा

या सजीव सृष्टीमध्ये अनंत जीव आहेत. प्रत्येक जीवाला केवळ सुखाची अपेक्षा असते. परंतु सजीवांमध्ये सारासार विचार करुन जीवन जगण्याचा आणि मार्गक्रमण करण्याचा अधिकार परमेश्वराने केवळ मानवाला दिलेला आहे. मात्र तोही सुखाच्या शोधात धडपडतो आहे. त्या सुख प्राप्तीला देखील मर्यादा आहेत. मर्यादेत जीवन जगला तर ते सुंदर होते. मर्यादेपलीकडे गेला की, माणसाचा राक्षस व्हायला वेळ लागत नाही. संत गहिनीनाथ महाराज म्हणतात-

मार्तंड का उडी मारली,
आकाशाची घडी मोडली।
क्रमे क्रमेने मार्ग पारेल,
गुलाल उधळीत स्वागत झाले।

सूर्य आकाशात हळूहळू अंतर कापतो. पूर्वेकडून एकदम उडी मारुन पश्चिमेकडे जात नाही. त्यामुळे जगाची अथवा समाजाची घडी विस्कटून टाकत नाही. म्हणून मर्यादेत मार्गक्रमण करुन चालणं पूर्ण होताच जनतेकडून सायंकाळी गुलाल उधळीत स्वागत होते. सूर्याने मर्यादा सोडली तर काय होईल याचा विचारही आपण करु शकत नाही. आजारी माणसाला रोग नाहिसा करण्यासाठी वैद्य एकदम एकाच दिवशी संपूर्ण औषध घटाघटा प्यायला सांगत नाही. रोगी सुध्दा तसं पिऊ शकत नाही. जेव्हा वैद्याने दिलेल्या मर्यादेत औषध घेतल्यानेच आजार बरा होतो. अन्यथा त्याचे विपरीत परिणाम होतात. 'मर्यादा' या शब्दाचा विचार केला तर जगात अशी एकही गोष्ट नाही की, तिला मर्यादा नाही. मानवी आयुष्याला, परमेश्वराने जगाची निर्मिती केली त्यालाही मर्यादा आहे. मर्यादा नाही ती केवळ परमेश्वराला. तोच फक्त अमर्याद आहे.

एक भिकारी रोज भीक मागत हिंडत असे. त्याला एका सज्जन व्यक्तीने विचारले, ''अरे तुला जर लाख रुपयाची लॉटरी लागली तर काय करशील ?'' थोडा वेळ थांबून भिकारी म्हणाला, ''मला एवढे पैसे मिळाले तर भीक मागण्यासाठी हाताखाली दहा वीस भिकारी ठेवेन.'' थोडक्यात काय तर ज्याची त्याची विचार करण्याची देखील मर्यादा असते. एखादा पदार्थ आपल्याला खूप आवडतो. नेमका तोच पदार्थ खाऊ नका असे डॉक्टर सांगतात. डॉक्टरांपुढे आपण कबूल करतो की, नाही खाणार तो पदार्थ. परंतु डॉक्टरांनी सांगितलेले पथ्य कितीजन पाळतात. हजारात एखादा माणूस मर्यादा पाळतो. ताटात आलेला आवडता पदार्थ खाणे टाळतो. मात्र जे मर्यादा पाळत नाहीत ते अनेक रोगांना आमंत्रण देतात. शहनशाह बाबा अवतारसिंहजी महाराज अवतारवाणीत म्हणतात-

औषधी ना होई गुणकारी जर पथ्य पाळीले नसे।
बोले मुखाने करी न कराने कार्य सिध्दीला जात नसे।
गुरुवाचोनी ज्ञान न उपजे टिकत नसे ज्ञानाविण ध्यान।
अवतार पांच प्रण जब ना मानी अशक्य होणे ब्रह्मज्ञान।।

समयाचे समर्थ सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज देखील आपणास ब्रह्मज्ञान देऊन निराकार प्रभूचे अमर्याद दर्शन घडवित आहेत आणि हे करताना प्रत्येकाला सेवा, सत्संग, नामस्मरण ही तीन कर्म आणि पाच प्रणांच्या मर्यादेत बांधून घेतले आहे. तिलाच आपण गुरुमर्यादा समजतो आणि श्रध्दापूर्वक, निष्ठेने पालन करतो. ज्यांनी गुरुमर्यादा सोडली त्याचे परिणामही भोगावे लागतात. शेगावचे श्री गजानन महाराजांचा एक शिष्य विठोबा घाटोळ नेहमी पुढे पुढे करायचा. दर्शनाला आलेल्यांना आपण सर्व शिष्यांमध्ये प्रमुख असल्याचा आव आणायचा. महाराजांजवळ आपली खूप वट असल्याचा देखावा करण्यात तो पटाईत होता. संत, सद्गुरु अंतर्यामी असतात. ते सर्व ओळखून असतात. योग्य वेळेची वाट पहात असतात. श्री. गजानन महाराज एकदा निजलेले होते. त्यावेळी काही भक्तमंडळी दर्शनाला आली. त्यांचे

(पान २१ वर)

जीवनमुक्ती

खरे पाहता, जन्म – मरणाच्या या चक्रात जिवात्म्यास जखडून ठेवणारे साखळदंड म्हणजेच त्याच्या इच्छा आणि वासना. म्हणूनच लिहिले आहे की, वासनेच्या संगे, जन्म घेणे लागे।

प्रत्येक जीव हा जन्मास येताना आपल्यासोबत अनेक इच्छा – अपेक्षा, वासना – कामना घेऊनच येतो. इतकेच नव्हे, तर ही इच्छा किंवा वासना (कामना) पूर्ण झाली नाही तर मात्र तो दु:खी होतो आणि आपले पूर्ण आयुष्य त्या दु:खामध्ये संपवून टाकतो व त्या कामनापूर्तीसाठी त्यास पुनर्जन्म घ्यावा लागतो म्हणजेच जोपर्यंत त्यास आपल्या जन्माचे मुख्य कारण समजत नाही, तोपर्यंत तो जन्म-मरणाच्या बंधनात बंदिस्त होतो.

पटवून द्यायचे झालेच तर, भुंग्याचे उदाहरण देता येईल. ज्याप्रमाणे टणक लाकडालादेखील भेदण्याचे सामर्थ्य भुंग्यामध्ये असतानाही देखील जेव्हा भुंगा कमळाच्या फुलात अडकतो तेव्हा कमळाच्या मकरंदाचा त्याला मोह होतो आणि सहजशक्य असताना देखील नाजूक पाकळ्यांना छेदून न जाता त्या मोहापायी त्यातच अडकून गतप्राण होतो. त्याप्रमाणे मनुष्य हा स्वातंत्र्य मुक्त आणि सामर्थ्यवान असून सुध्दा संसाराच्या आसक्ती आणि मोहापायी आपले अनमोल जीवन वाया घालवतो.

अशा या जिवात्म्यावर जोपर्यंत ज्ञानी आणि समर्थ सद्गुरुची कृपा होऊन त्याला आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत तो भौतिक बंधनातून मुक्त होत नाही. आत्मसाक्षात्काराच्या जोरावरच जिवात्म्याची वासना (कामना) नष्ट होते आणि त्याला जन्म-मरणाच्या चक्रात जखडून ठेवणारी बंधनं तुटून पडतात.

म्हणूनच समर्थ सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या आदेश-उपदेशावर चालूनच आपले जीवन सार्थक करुन जीवनमुक्ती प्राप्त करता येते.

कु. महेंद्र प्र. माने
युनिट नं.२१० ठाणे

~~~~~~~~~~

जीवनात असावी ...(पान २८ वरुन)

दर्शन होऊ शकले नसल्यामुळे व तातडीने परतायचे असल्यामुळे स्वत: महाराजांना उठवू शकत नव्हते. तेव्हा त्यांनी विठोबाला गळ घातली. तुम्हीच सर्वश्रेष्ठ शिष्य आहात अशी स्तुती केली. त्यामुळे विठोबा फुगला. आपली मर्यादा न ओळखता महाराजांना जागवले. भक्त मंडळींचे दर्शन झाले. ते परतले. मात्र विठोबाने गुरुमर्यादा ओलांडली. त्यामुळे प्रसाद मिळाला, नसती उठाठेव केल्यामुळे चोप मिळाला. तो पळून गेला. शिष्याने आपल्या मर्यादा ओळखून वागावे. स्वत:च्या मर्यादांची जाणीव असणे हे माणसाच्या सुंदर जीवनाचे लक्षण आहे. असा शिष्य कधीच गुरुमर्यादेचे उल्लंघन करीत नाही. तो आपले जीवन सद्गुरुचरणी अर्पण करतो. यासाठी म्हणावे लागेल की, आपले जीवन सुंदर बनवायचे असेल तर गुरुमर्यादेत राहूनच जीवन व्यतीत करावे.

श्री. जे.एस्. देवरे
गिसाका, दाभाडी,
ता. मालेगाव, जि. नाशिक

~~~~~~~~~~

महाराष्ट्र संत समागमाचा आलेख

जानेवारी २०१२च्या संत निरंकारी (मराठी) मासिकात महाराष्ट्रानध्ये ज्या वर्षापासून संत समागम सुरु झाला तेव्हापासून आजतागायत ४५ वर्षांचा इतिहास प्रकाशित केला होता. हा इतिहास प्रकाशित करताना विशेष निवेदनही करण्यात आले होते की, हा इतिहास सादर करताना (पान २३वर) काही उणिवा राहिल्या असतील.

वाचकांचे आम्ही सर्वप्रथम मन:पूर्वक अभिनंदन करत आहोत, कारण काही जुन्या-जाणत्या महात्म्यांनी अजूनही समागमाचा इतिहास माहीत असल्याचे फोनद्वारे कळविले आहे. पत्रिका विभागातर्फे विनंती करण्यात येत आहे की, आपल्याजवळ उपलब्ध असलेली माहिती पत्राद्वारे दादर पत्रिका कार्यालयात पाठवावी जेणेकरुन पुढील रेकॉर्डसाठी ती उपयोगी होईल.

संपादक

~~~~~~~~~~
~~~~~~~~~~

"मानवाला मानव प्रिय असावा, तो एकामेकाचा आधार बनावा"

का कुणास ठाऊक ?
देवाच्या मनात आलं, की देवाला कुणी भरवलं ?
पण देवाला वाटू लागलं आपलं रामराज्य हरवलं
म्हणून देवाने पुन्हा एकदा रामायण २ करायचं ठरवलं
आप्त मित्र गोत्र, सर्व भूमिकांची फिल्स होती पात्र
पण बाकी होते भक्त हनुमान आणि प्रभू राम
देवालाही प्रश्न पडला हे कुणाला द्यायचं काम ?
कारण याचं कामच रामायणाची जान होती,
रामराज्याची शान होती,
मानवतेची सुंदर कला यांच्याकडे छान होती
मी म्हटलं देवा, हे टेंशन सोडा आणि विचार करा थोडा
प्रत्येक युगात असंच झालंय, हिरोचं काम देवा तुम्हीच केलंय
कधी महम्मद पैगंबर, येशु ख्रिस्त, गुरु नानक,
गौतम बुध्द, श्रीकृष्ण भगवान आणि प्रभू राम
मानवतेच्या प्रत्येक चित्रपटात देवा तुमचंच
उठून दिसलंय काम
देवा, आम्ही सर्व सामान्य चित्रपटात पाहतो
व्हिलनच मार खातो
पण या बाबतीत मात्र तुमचं फसलय,
तुम्ही हिरो असून काय काय सोसलय ?
देव म्हणाला, कधी कधी माझ्याही राहनशीलतेचा
पाहिला जातो अंत, पण मला नाही त्याची खंत
मला एवढंच दुःख कष्ट, की माझा हा मानवतेचा इशारा
त्यांना समजत नाही स्पष्ट
म्हणून मी विचार केलाय आणि रामायण २च्या स्क्रीप्टमध्ये थोडा बदल केलाय
रामायण २ मध्ये माझं रुप पाहिल्यासारखं नसणार आहे
आणि मी वेगळ्याच आउट लुक मध्ये दिसणार आहे.
कारण मला मानवतेला जपायचंच खूप,
माणसाचं रुप, अंतरंगातील स्वरुप
मला जात, पात, धर्म, भाषा, प्रांत, देश,
वेषभूषा यांचं बंधन तोडायचं आहे
आणि ब्रह्मज्ञान देऊन थेट माणसाला
माणसाशी जोडायचं आहे
मानवाला मानव प्रिय असावा, तो एकमेकाचा आधार बनावा
हे माझे तत्व आहे आणि ध्येय विश्वबंधुत्व आहे
त्यासाठी रामायण २ मध्ये माझ्याकडे धनुष्यबाणा ऐवजी
प्रेम हे शस्त्र असेल, ब्रह्मज्ञान अस्त्र असेल,
आणि हनुमंता तुझ्याकडे गदा ऐवजी मानवतेचं अस्त्र असेल
मी म्हटलं देवा हनुमंताच काम गेला, छान केलंत देवा
कारण या कामाचा माझ्याकडे आहे अनुभव तेवा
कारण शाळेत असताना मी हनुमंताचा रोल केलाय
आणि त्यातील रामाला असं आढळलं,
की १००रु. सर्वात पहिलं बक्षीस मीच मिळवलं
देव म्हणाला येथे मिळवायचं नाही,
काही कमवायचं आहे, काही गमवायचं आहे
एकमेकाला आधार देऊन मानवतेला सुंदर करायचं आहे
एकमेकाच्या हृदयावर राग ऐवजी प्रेम अक्षर कोरुन,
एकमेकाला प्रेमाने जोडून मानवतेचा सेतू बांधायचा आहे,
त्याला प्रेमानेच सांधायचा आहे आणि
अवगुणांची लंका दहन करुन प्रेमानेच नांदायचं आहे
आज समोरचं वातावरण पाहून वाटतंय
आणि खरंच वाटतंय की
आज आपण रामायण २ मध्ये आहोत आपलं भाग्य आहे थोर
कारण समयाचा राम आज आहे समोर
ज्याचं प्रेम हे शास्त्र आहे आणि ब्रह्मज्ञान अस्त्र आहे
जो विश्वाचा शांतीदूत आहे, मानवतेच्या सुंदर हारातील ब्रह्मसूत आहे आणि मानवतेचा देवदूत आहे
रामायण २ मध्ये कौसल्या राजमाता, सीतामाई पूज्य माता,
आणि बाबाजी आपण राम स्वतः
सर्वांना समदृष्टीने पाहता, प्रेम देता, प्रेम घेता,
लाखो किलोमीटरचा प्रवास करता, ध्येय मानवता
आजही या वानरसेनेचं प्रेम पाहून बाबाजी मनोमनी हसत आहेत
आणि ठरल्या प्रमाणे वेगळ्याच आउट लुक मध्ये दिसत आहेत
बाबाजी आपल्या चरणावर विनंती आहे खास
रामायण २ मध्ये आम्हाला आपला मानवतेचा इशारा कळू दे,
आम्हाला हनुमान नाही होता आलं तरी चालेल
पण या मानवतेच्या दरबारी आम्हाला खारीची सेवा तरी मिळू दे

श्री. बाळकृष्ण ज. कासार
खेड, रत्नागिरी

~~~~~~~~~
~~~~~~~~~

जिथे मानवता वसे

जिथे वसे मानवता खरी
तिथे नांदे सखा श्रीहरि ।।धृ।।

माणुसकीचा, मानव धर्म
निर्मोहाचे, करी सुकर्म
करुणा जयाच्या अंतरी
तिथे नांदे सखा श्रीहरि ।।१।।

मानवता ही, मानव जोडी
दगडाला ही, पाझर फोडी
हृदयी जो प्रेम हे भरी
तिथे नांदे सखा श्रीहरि ।।२।।

परहितास्तव, जगतो जीवन
तो महामानव, जगती पावन
निर्मळ भाव गंगेच्या परि
तिथे नांदे सखा श्रीहरि ।।३।।

ऐशा मानवा संत म्हणावे
गुण तयाचे 'दिलीप' गावे
करी तयाची जो चाकरी
तिथे नांदे सखा श्रीहरि ।।४।।

श्री. दिलीप मोरे
नालासोपारा (पू) जि. ठाणे

संत निरंकारी (मराठी) मासिकाचे
मालक हक्क व इतर तपशील संबंधी
(केंद्र सरकारच्या फॉर्म ४ नियम ८ अन्वये)

प्रकाशन स्थळ
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४

प्रसिध्दी काळ
मार्च २०१२ मासिक (दरमहा)

मुद्रकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

प्रकाशकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

संपादकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

मालकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
संत निरंकारी मंडळ
माहूल रोड, चेंबूर कॅम्प, मुंबई-७४.
भारतीय

मी श्री. चंद्रकांत अनंत जाधव प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

दि. १-३-२०१२

श्री. चंद्रकांत अनंत जाधव
प्रकाशक व संपादक

देवाचिये व्दारी उभा क्षणभरी

आपण वर फेकलेला चेंडू खालीच का येतो ? हा प्रश्न क्षणभर न्यूटनच्या डोक्यात आला आणि तोच क्षण त्याच्या जीवनात सर्वात मौल्यवान ठरला. त्या क्षणामुळेच 'गुरुत्वाकर्षणशक्ती' या नावाबरोबर न्यूटनचे नाव जोडले गेले. त्याच्या डोक्यात असा प्रश्न आलाच नसता, जिज्ञासा निर्माण झालीच नसती तर त्याचे उत्तर मिळवण्यासाठी त्याने धडपड केली नसती आणि गुरुत्वाकर्षणसारख्या शक्तीबरोबर न्यूटनचे नाव कधीच जोडले गेले नसते.

त्याप्रमाणे हा 'मायापती' ' सृष्टिनिर्माता' कोण असेल असा प्रश्नच आपल्या डोक्यात येत नाही. सांसारिक प्रश्न सोडवता सोडवता क्षणभरसुध्दा या मनाला, बुध्दीला या ईश्वराबद्दल विचार करण्यासाठी वाव मिळत नाही.

म्हणूनच ज्ञानेश्वरमाऊली हरिपाठात म्हणतात,
देवाचिये व्दारी उभा क्षणभरि

न्यूटनच्या डोक्यात जसा प्रश्न आला तसं तू क्षणभर तरी तुझे मन, बुध्दी या ईश्वरासाठी एकाग्र करुन असा विचार कर की, अशी कोणती शक्ती आहे की जिच्या सत्तेने या पूर्ण ब्रह्मांडातील सर्व ग्रह, उपग्रह, सूर्य, तारे हे ठरवून दिलेल्या कक्षेतच परिभ्रमण करतात. यांचा सर्वोच्च अधिकारी तरी कोण असेल ?

त्याच्याबद्दल बोलताना म्हणतात, 'कण कण मे भगवान.' ईश्वर जळी स्थळी काष्ठी पाषाणी भरुन उरलेला आहे असे म्हटले जाते, पण असे म्हणणारेच त्याला इतरत्र धुंडाळतात. श्रीसमर्थ रामदासस्वामी दासबोधात म्हणतात,

देव्हारांचा उठोनि देव । करु नेणे सर्व जीव।
तयाचेनि ब्रह्मकटाव। निर्मिला न वचे।।
ठाई ठाई देव
असती । तेहिं केळि नाहीं क्षिती ।
चंद्र सूर्य तारा जीमूती ।
तयाचेनि नव्हे । सर्वकर्ता तोचि देव ।
पाहो जाता निरावेव ।

(दासबोध : दशक-८, समास-१)

अर्थ - आपल्या देव्हाऱ्यातल्या देवाने उठून ही सृष्टी, सर्व जीव निर्माण केले नाहीत. त्याच्याने अनंत ब्रह्मांडाचे गोल निर्माण होऊ शकत नाहीत. तसेच जागोजागी जे देव आहेत त्यांनी ही पृथ्वी निर्माण केली नाही. चंद्र, सूर्य, तारे, मेघ हेही निर्माण केले नाहीत. हे सर्व निर्माण करणारा निरावेव (निर + अवयव) अवयव नसलेला असा आहे.

ईश्वराबद्दल ओढ, प्रेम, तळमळ असणाऱ्या भक्ताच्या मनात हा निरावेव सर्वव्यापी देव आहे तरी कसा ही जिज्ञासा जेव्हा निर्माण होते तेव्हा ती जिज्ञासा त्याला शांत बसू देत नाही. त्याने कितीही वेद, ग्रंथ, उपनिषद वाचली तरी त्याला या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत.

पृथ्वीत असणाऱ्या गुरुत्वाकर्षणशक्तीची ओळख न्यूटनला झाल्यानंतर त्याच्या अनेक प्रश्नांना उत्तरे मिळाली. संशोधनक्षेत्रात भरभरुन यश आले त्याप्रमाणे सद्गुरुकडून ईश्वराची ओळख झाल्यावर भक्ताला ईश्वराबद्दलच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात. आजपर्यंत त्यांनी जी पारायणे केली, ग्रंथ वाचले त्या सगळ्यांचा अर्थ समजू लागतो. आता तो हे ग्रंथ फक्त पारायण म्हणून वाचत नाही. ते समजून घेत वाचतो आणि क्षणोक्षणी सद्गुरुला धन्यवाद देतो की, सर्व ग्रंथांचे सारच तू माझ्या हातात दिलंस.

म्हणून तर समर्थ म्हणतात, छप्पन भाषांमधील जितके ग्रंथ आहेत. सर्व वेद शास्त्र या सर्वांचं रहस्य एकच आहे आणि जे पुराणांना समजत नाही, जेथे वेदांनी हात टेकले हे रहस्य सद्गुरुमुळेच समजते. सर्व धर्मांचे, सर्व शास्त्राचे सारच सद्गुरुने या ब्रह्मज्ञानरुपी सूत्रात बसवलेले आहे. हे ब्रह्मज्ञान घेतल्यावर तो कोणत्याही जातीचा असो, धर्माचा असो ईश्वराबद्दलच्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तो मिळवू शकतो. एवढंच नव्हे तर भौतिक जीवन जगताना येणाऱ्या अनेक समस्यांना, दुःखांना तोंड देण्याची क्षमताही त्याच्यात येते, पण या सूत्राचा वापर करताना सद्गुरुने सांगितलेले पाच प्रण म्हणजे पाच नियमच आहेत. या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. ब्रह्मज्ञानरुपी गंगेच्या सत्संग, सेवा, नामस्मरण या त्रिधारांमधे आंघोळ

(पान ३४ वर)

सत्संगाचे संस्कार

माणसानं देव व्हावं...देवापर्यंत जावं...ही या देशातल्या सगळ्या संतांची इच्छा होती. माणसाला खरंच देव होता येईल का? देव पदापर्यंत जाता येईल का? तुकाराम महाराजांनी देव पदापर्यंत जाण्याचा मार्ग सांगितला. महाराज म्हणतात, **देव पहा वो देव पहा वो। उंच जागी उभे राहा वो।।**

आता ही उंच जागा म्हणजे इमारतीवरची गच्ची किंवा सर्वात उंच पर्वतावरची उंच जागा नाही. देवपण आपल्यातच आहे. फक्त त्याच्या प्रगटीकरणासाठी टाकीचे घाव सहन करावे लागतील. हे घाव सहन करण्याची क्षमता ज्यांच्यात आहे ते देव पदापर्यंत जाऊ शकतात. दगडाला जर देव होता येते, तर माणसाला होता येणार नाही का? दगडातल्या देवपणाच्या प्रगटीकरणासाठी जाणकार शिल्पकार भेटला पाहिजे. छिन्नी-हातोड्याचे घाव दगडाने सहन करायला हवेत. मगच दगडातून सुरेख मूर्ती प्रगट होईल. माणसाच्या जीवनाचेही असेच आहे. योग्य शिल्पकार (सद्गुरु) मिळाला आणि संस्काराच्या हातोड्याने हे आयुष्य घडवले गेले, तर 'नराचा नारायण' व्हायला वेळ लागणार नाही. 'मायकल एंजिलो...!' एकदा रस्त्याने जात होते. चालता चालता एका संगमरवरी दगडाच्या दुकानाजवळ एंजिलो थांबले. दुकानाजवळ एक ओबड धोबड दगड पडलेला होता. लोक त्या दगडावर चपला ठेवत होते. मायकेलने दुकानदाराला विचारले, हा दगड रस्त्यात का टाकला? दुकानदार म्हणाला, हा टाकावू दगड आहे. मायकेल म्हणाला, हा दगड मला आवडला. मी घेऊन जाऊ का? दुकानदार म्हणाला, अहो! फुकट घेऊन जा. हा दगड येथून हलवला तर अडचण तरी कमी होईल. मायकेलने दगड घरी आणला. दोन वर्षे अथक प्रयत्न करुन त्या दगडातून भगवान येशूची सुंदर मूर्ती घडवली. इतकी सुबक, इतकी सुंदर की बस बघतच राहावी. मायकेलने एक दिवस दुकानदाराला घरी बोलावले आणि येशूची सुंदर मूर्ती दाखवली, दुकानदार तर अवाकच झाला. त्याचा प्रथमदर्शनी तर विश्वासच बसेना....! दुकानदार म्हणाला, "अहो! या टाकावू ओबड धोबड दगडातून इतकी सुंदर मूर्ती कशी घडवली." मायकेल म्हणाला, "अहो! मूर्ती तर दगडातच होती. फक्त छिन्नी-हातोड्याने अनावश्यक भाग मी काढून टाकला. दगडातून मूर्ती प्रगट झाली." आज माणसाचंही असंच आहे. संस्काराविना जीवन ओबड धोबड राहून जातं. सनातन वैदिक धर्मात संस्काराला अनन्य साधारण महत्त्व आहे. संस्कार या शब्दाचा अर्थच मूळी घडविणे, पवित्र करणे, शुध्द करणे असा आहे. माणसाचे जीवन तर फक्त संस्कारानेच समृध्द होते. स्मृतिकार म्हणतात, **जन्मना जायते शूद्रः संस्कारात दिजू उच्यते।** संस्कार म्हणजे 'योग्यता जननम्...!' ही पात्रता निर्माण होण्यासाठी शारीरिक दोष नाहिसे करुन नवीन गुण निर्माण करणे म्हणजेच संस्कार. संस्काराची व्याख्या करताना स्मृतिकार म्हणतात, **दोषापनोदन पूर्वक गुणाधान संस्कारो हिनांगपूरणां वा....!** दोष दूर करुन गुणांचे आदान किंवा संस्करण करणे आणि विविध अंगाची उणीव भरुन काढणे म्हणजे संस्कार. उदाहरण द्यावयाचे झाल्यास हिरा हे एक उत्तम रत्न आहे. हा खनिज पदार्थ आहे. जमिनीतून काढल्यावर त्याला माती चिकटलेली असते. तो धुतला म्हणजे स्वच्छ होतो. धुणे हा पहिला संस्कार. एवढे करुन भागत नाही. त्याचे मूल्य वाढवण्यासाठी त्याला पैलू पाडावेच लागतात. मगच तो चकाकतो. अशा या हिऱ्याला सोन्याच्या कोंदणात बसवावे लागते. मगच तो शरीरावर धारण करता येतो. एवढे संस्कार केले तरच हिऱ्याचे मूल्य वाढते. मनुष्य जीवनाचेही असेच आहे. 'योग्यता जननम्...!' ही पात्रता निर्माण होण्यासाठी शारीरिक दोष नाहिसे करुन नवीन गुण निर्माण करावे लागतात. मगच देव पदापर्यंत जाता येते. भारतीय वैदिक परंपरेत मनुष्याला गुणसंपन्न, ईश्वरनिष्ठ, धर्मपारायण बनविण्यासाठी संस्काराचे महत्त्व वर्णन केले आहे. अनंत शक्ती मनुष्यात वास करते. त्या शक्तीला प्रगट करण्याचे काम करावे लागेल. रामही माझ्यातच आहे. रावणही माझ्यातच आहे. कृष्णही माझ्यातच आहे. कंसही माझ्यातच आहे. फक्त संस्काराच्या हातोड्याने आणि विवेकाच्या छिन्नीने देहरुपी दगडातील रावणरुपी अनावश्यक भाग तोडून टाकावा लागेल. याच देहातून

मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाची मूर्ती प्रगट होईल. संस्कारामुळेच मनुष्य पशुत्वाच्या पातळीवरुन माणुसकीच्या जगात येईल आणि देवत्वाकडे वाटचाल करील. निरंकारी तत्वज्ञानाच्या सत्संगात विवेकाच्या छिन्नी हातोडयाने मनुष्यातील विकारांचा अनावश्यक भाग काढून टाकला जातो. मानवाच्या जीवनात संस्काराचे महत्व प्रतिपादन केले जाते. स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण परमहंस यांना विचारले होते, "गुरुदेवा! देव या जगात आहे का? असलाच तर कुठे असेल?" रामकृष्ण म्हणाले, "देव तर आपल्याजवळ आहे. आपल्यातच आहे." स्वामी विवेकानंद म्हणाले, "मग गुरुदेव! तो दिसत का नाही?" रामकृष्ण म्हणाले, "नरेंद्रा तू जसा मला पाहात आहेस आणि मी जसा तुला पाहतोय. तसा देव मला दिसत आहे. प्रत्येक बीजात वृक्ष असतो, पण बीजातला वृक्ष आकाराला येण्यासाठी बीजाला भूमीत गाडून घ्यावे लागते. हवा, पाणी, खत मिळावे लागते. मगच त्याच्यातले वृक्षत्व प्रगट होते. दुधात तूप असतेच पण काही क्रिया व प्रकियांनीच ते प्रगट होते. विनासायास दुधातले तूप, बीजातला वृक्ष प्रगट होतो का?" माणसातले देवत्व सुध्दा सहज प्रगट होणार नाही. संस्काराच्या साधनेतूनच ते प्रगट होईल. टाकीचे घाव सोसल्यानंतर ओबड धोबड दगडातून जर देवत्व प्रगट होऊ शकते तर जिवंत माणसात ते प्रगट होणार नाही का? पण आज 'फास्ट फूड' चा काळ आहे. वर्तमान काळात माणसाला विनासायास व परिश्रमाशिवाय मोठेपण हवे असते. पण शरीर श्रमाशिवाय जीवनाला नैतिक अधिष्ठान लाभत नाही. नैतिक अधिष्ठानाशिवाय देवपण प्राप्त होत नाही. म्हणून तर तुकोबा म्हणतात, **देव पहावो देव पहावो। उंच जागी उभे राहावो।।** ही उंच जागा म्हणजे सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा, श्रीमंती, मोठेपण, कुलवर्ण यांच्या सीमेपलीकडे आहे. कनक आणि कामिनी यांचा मोह नसणारी माणसेच या देव पदापर्यंत जाऊ शकतात. संस्काराची संपत्ती न मिळवता नुसती आर्थिक संपत्ती म्हणजे विपत्ती आहे आणि हीच संपत्ती माणसाला मानवतेकडून पशुत्वाकडे नेते. संस्काराची दारे बंद करुन विकृतीच्या अंधारात जगण्याने देव कळणार नाही. देव कळण्यासाठी संस्काराची शुध्द बुध्दी निर्माण करावी लागेल. ही बुध्दी हाच देवत्वाचा आधार आहे. ही संस्कारक्षम बुध्दी कार्यरत होण्यासाठी निरंकारी तत्वज्ञानाच्या सत्संगात डुंबावे लागेल. निरंकारी सत्संग हाच मनुष्याला पशुत्वाकडून देवत्वाकडे नेतो. परमेश्वर सर्वव्यापी आहे. जीवनाचे नित्य कर्म करीतच सर्वव्यापी परमेश्वराला जाणता येते. त्यासाठी फक्त निष्काम कर्म करा, सत्याचं अनुसरण करा. सेवाभाव ठेवा. ध्यानाच्या डोहात उतरा. सद्गुरुच्या सान्निध्यात रहा आणि मनुष्य जन्माच्या मर्यादा पाळा. हे सर्व घडले की, मनुष्य कैवल्य सुखाला प्राप्त होतो. सत्संगाचे संस्कारानेच श्रेष्ठत्व प्राप्त होते. परमेश्वर हा सद्गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही. सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज आपल्या सत्संग प्रवचनात प्रेम, नम्रता, सहनशीलता, सेवाभाव, परोपकार, बंधुत्व या दैवी गुणांच्या संस्काराने मनुष्याला देवत्वाकडे नेतात. मानवी जीवन मूल्यांच्या मर्यादा आचरणात आणण्यासाठी संस्काराचे दान करतात.

श्री. भरतबुवा रामदासी

सराफ रोड, बीड

देवाचिये व्दारी उभा ... (पान ३२ वरुन)

करणं आवश्यक आहे. शहनशाहजी म्हणतात,

जो नर जाणे निरंकार हा पुनर्जन्म नाही त्याला।
जो नर जाणे निरंकार हा मरण दुःख नाही त्याला।
जो नर जाणे निरंकार हा संकट त्या येई न कधी।
जो नर जाणे निरंकार हा सदैव राहे आनंदी।
जो नर जाणे निरंकार हा दुःख न येई जवळ कदा।
जो नर जाणे निरंकार हा भय ना बाधे तया कदा।

(अवतारवाणी पद क्र.३४)

पण पाहण्याची जिज्ञासा निर्माण झाली तरच. म्हणूनच म्हटलंय

देवाचिये व्दारी उभा क्षणभरी,
तेणे मुक्ती चारी साधियेल्या।

सौ. सरस्वती सुनिल नांदोडे

जालना

तिसरा प्रण..... आहार

कुणाच्या खाण्या-पिण्या-पेहराव्याचा तिरस्कार करु नका असे सद्गुरु बाबाजींनी तिसऱ्या प्रणात आपल्याला सांगितले आहे. भौगोलिक परिस्थितीप्रमाणे, वातावरणानुसार व उपलब्ध अन्नाप्रमाणे आपला आहार असावा. शाकाहार हितकारक की मांसाहार यामध्ये खूप मतभेद आढळतात. शाकाहार खाणारे आपल्या अन्नाची प्रशंसा करीत आहेत, तर मांसाहार खाणारे लोक ''भाजीपाला खायला आम्ही काय गायी म्हशी आहोत?'' असे म्हणत असतात. हिंस्त्र मांसाहारी प्राण्यांप्रमाणे मनुष्याला सुळे आहेत जे की शाकाहारी प्राण्यांना नसतात. त्यानुळे माणूस हा प्राणी मांसाहारीच आहे असा युक्तिवाद मांसाहारी लोक करतात. माणूस हा केवळ शाकाहारी किंवा मांसाहारी नसून तो मिश्रहारी आहे, त्यामुळे त्याने शाकाहार आणि मांसाहार दोन्ही सेवन केले पाहिजे असेही काही सज्जन म्हणताना दिसतात.

पण माणूस शाकाहारी आहे. शरीर शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे की, माणूस कधीही मांसाहारी नव्हता. कारण त्याची जी आतडी आहेत ती मांसाहारी पशूच्या आतड्यासारखी नाहीत. मांसाहारी पशूची आतडी अगदी लहान असतात. म्हणूनच तर तुम्ही सिंहाचं पोट पहा किती लहानसं असतं. त्याची आतडी अगदी लहान असतात. याउलट शाकाहारी प्राण्याची आतडी कित्येक फुट लांब असतात.

'प्रचार एवं प्रबंध व्यवस्था (२००२)' या पुस्तकामध्ये आहार या उताऱ्यामध्ये बाबाजी काय सांगतात ते आपण त्यांच्याच शब्दात पाहू. ''सामुदायिक किंवा सार्वजनिक स्वरुपात जेव्हा भोजन (लंगर) बनविले जाते तेव्हा धार्मिक दृष्ट्या वर्जित खाद्यपदार्थांचा वापर करणे टाळावे. परंतु जर कोणी खाजगी स्वरुपात या गोष्टींचा वापर करीत असेल तर त्याने हेही लक्षात घ्यावे की International Level वर (आंतरराष्ट्रीय स्तरावर) देखील या गोष्टी टाळण्याकडेच लोकांचा कल दिसून येत आहे. अमेरिका, कॅनडा सारख्या देशातही लोक स्वतःहूनच मांसाहार सोडत आहेत आणि ते शाकाहाराकडे वळत आहेत. तेव्हा आपणही जर सहजगत्या शाकाहाराकडे वळत असू, तर ही फारच चांगली गोष्ट होईल. सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, जर या गोष्टीमुळे प्रचारात बाधा निर्माण होत असेल तर त्याचाही त्याग करण्याची आपली तयारी हवी.'' यामध्ये बाबाजींनी आदेशच दिलेला आहे की, सार्वजनिक ठिकाणी वैष्णव भोजन असावे. त्याचप्रमाणे व्यक्तिगत जीवनामध्ये मांसाहाराचा वापर करणाऱ्यांकरिता तो एक इशारा दिलेला आहे की, कॅनडा आणि अमेरिका सारख्या अत्यंत थंडीच्या प्रदेशातील लोकांचे आवडते अन्न मांसाहार असून देखील ते सुज्ञ लोक अशा अन्नाचा त्याग करुन शाकाहार स्वीकारत आहेत. कारण त्यांना मांसाहारातील दुष्परिणाम आणि शाकाहारातील लाभ चांगल्याप्रकारे समजला. "चोरी करणे वाईट आहे" असे बाबाजींनी म्हटल्यावर "चोरी करु नका" असे कोठे म्हटले आहे असा युक्तिवाद करुन जर कोणी चोरी करु लागला तर त्याला काय म्हणावे?

आमच्या युनिटच्या सेवादल भगिनी एकदा दिल्ली समागमच्या रेल्वे प्रवासातील आपला अनुभव सांगत होत्या. प्रवासामध्ये त्यांच्या समोर गुजराथी-जैन समाजाचा एक परिवार (निरंकारी नसलेले) होता. या सेवादलच्या भगिनींना कोठे व कशासाठी जात असल्याचे विचारल्यावरुन त्यांनी आपल्या निरंकारी मंडळाचे सिध्दांत व समागमाबद्दलची माहिती सांगितली. आस्थेने ते प्रश्न विचारत होते आणि तितक्याच तळमळीने या भगिनी त्यांना आपल्या मंडळाबद्दल, मानवाच्या उद्दिष्टाबद्दल आध्यात्मिक माहिती सांगत होत्या. ते सर्वजण या भगिनींनी सांगितलेले विचार भक्तीभावाने ऐकत होते. या नवीन सज्जनांना निरंकारी मंडळाशी जोडले जाण्याचे पुण्य आपल्याकडून घडत असल्याचा आनंद या भगिनींना होत होता. दुपारच्या जेवणाच्या वेळेस मात्र आपले डबे काढून त्यांच्यासमोर खाण्याची पंचाईत झाली. कारण त्या भगिनींकडे शाकाहारी भोजन नव्हते. अशा प्रकारे अशा लोकांपर्यंत आणि इतरांपर्यंत आपल्या

(पान ३८ वर)

दु:ख मूळ संसार

रुप मनोहर यौवन आणि संपत्तीला नाही सुमार।
प्रणाम करीते दुनिया सारी करीती जरी सारे सत्कार।
नोकर चाकर यांच्याकडूनी करुन घेई सारे काम।
पलंगावरी सुंदर गाद्या सुख निद्रा ऐशो आराम।
दान धर्म ही अमाप केले यश गाईल जरी संसार।
अवतार हरिला जो ना जाणे ऐशा नरा असो धिक्कार।

(अ.वा. १३३)

युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज म्हणतात की, रुप आणि यौवन कितीही सुंदर असो शिवाय संपत्तीही कितीही असो तसेच पलंगावरती सुंदर अशा गाद्या आहेत, जवळ नोकर चाकर आहेत आणि सारी दुनिया प्रणाम करीत आहे; परंतु जर या हरिला जाणून भक्ती केली नाही तर संसार हा दु:ख रुप राहणार आहे. म्हणूनच युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज म्हणतात की, अशा नराचा धिक्कार असो. मानव संसारात गुंतून राहिल्यामुळे तो सुखी होतच नाही. समर्थ रामदास स्वामींनी तर स्पष्ट सांगितले की,

संसारी सुख मानीती। ते प्राणी मुढमती।
जाणोनी डोळे झाकीती। पढतमुर्ख।
प्रपंचसुखे करावा। परी काही परमार्थ वाढवावा।
परमार्थ अवघाची बुडवावा। हे विहित नव्हे।।

संसारात गुंतून त्यामध्ये रममाण होऊन सुख मानणारे मूर्ख आणि ज्यांना संसाराचे स्वरुप समजले असूनही त्याकडे दुर्लक्ष करतात ते पढत मूर्ख आहेत. सांसारिक सुखामुळे शाश्वत आत्मानंदाचा लाभ होत नाही. कारण सुखं क्षणभंगुर व दु:खाचीच मुळं असतात शिवाय सांसारिक सुखाची वाढत जाणारी तृष्णा शेवटी मनुष्याला दु:खीच बनविते. संसार करणे वाईट नाही, परंतु तो करत करतच परमार्थही करावा. त्यामुळे मनुष्याचा शेवटचा दिवस गोड होतो. संसाररुपी सागरातून तरुन पैलतीराला पोहचणे यात जन्माचे सार्थक आहे असं संत महात्मे म्हणतात. त्याच साधकाला मोक्षप्राप्ती होते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात,

आलीया संसारा उठा वेग करा।
शरण जा उदारा पांडुरंगा।
देह हे काळाचे धन कुबेराचे।
तेथे मनुष्याचे काय आहे।
देता देवोविता नेता नेवविता।
तेथे याची सत्ता काय आहे।
निमित्ताचा धनी केला असे प्राणी।
तुका म्हणे म्हणोनी व्यर्थ गेला।।

तुकाराम महाराज सांगतात, संसारात आलात तर त्वरित परमेश्वराची प्राप्ती करुन भक्ती मार्गाला लागा. देणारा आणि घेऊन जाणारा परमेश्वरच आहे. तेथे मनुष्याचे काहीच चालत नाही. हा नाशिवंत देहच काळाचा आहे. हे सर्व समजून अजूनही मनुष्य प्राणी या संसाररुपी सागरातच गटांगळ्या खात राहतात आणि शेवटी या भवसागरात बुडतात. कारण या प्रपंचाचे ओझे घट्ट धरुन ठेवतात, म्हणून वाया जातात आणि आशा, लोभ, मोह, वासना यामुळे अधोगतीला जातात. तरीही संसारात गुंतलेलेच राहतात आणि भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी धडपड करतात. परंतु त्यांना हे समजत नाही की, संसार हा दु:ख मूळ आहे. गुरु नानकदेवजी म्हणतात, **''नानक दु:खीया सब संसार''** तेव्हा या संसारात सुखी कोण आहे? तर त्याचेही उत्तर गुरुनानकदेवजी देतात, **''सुखीया केवल नाम आधारा''** ज्याच्याजवळ परमेश्वराच्या नामस्मरणाचे, भक्तीचे साधन आहे आणि सद्गुरुवर अतुट विश्वास आहे, तो खरा या संसारात खरा सुखी आहे. संसारात माणसं जगत असताना जागे होऊन जगत नाहीत. अज्ञानाच्या अंधकारातच त्यांचं अनमोल

असं जीवन संपून जातं. मग अशा मनुष्याजवळ कितीही धनदौलत, म्हालमाड्या, गाड्या असल्यातरी त्याला जर आध्यात्मिक ज्ञान नसेल, सद्गुरु त्याच्या जीवनात आले नसतील, तर अशा मनुष्याचे जीवन व्यर्थ आहे म्हणूनच त्याचा संसार दुःखमूळ म्हटलेला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

पै भिंगोरी निधिये पडली।
ते गमे भूमीवरी जैसी जडली।
ऐसा वेगातिसये भूली। हेतू होय।
हे बहू असो झटली। अंधारे भोवंडीता कोलथी।
ते दिसे जैसी आयती। चक्राकार।

भिंगरी गरागर फिरते. जशी जमिनीवर उभीच राहते आणि जमिनीला चिटकल्यासारखी दिसते, परंतु तो भासच असतो. एखादा जळालेला लाकडाचा तुकडा (कोलीत) गोलाकार फिरवला तर ते कोलीत अखंड गोलाकारच आहे असे दिसते, तोही भासच आहे. त्याचप्रमाणे हा संसार भासमय होय. मुळात तो विनाशी असूनही अविनाशी भासतो. हा भ्रमच आहे. हा भ्रम सद्गुरु कृपेने नष्ट झाला की, संसाराला कधीच स्थिर मानत नाही. हे सत्य कळणे यालाच ज्ञान म्हटले आहे. अनंतकाळी कोणीही कोणाचा नाही. ज्याचे सुख त्यालाच आणि ज्याचे दुःख त्यालाच भोगावे लागते. हीच जगाची रहाटी आहे. मग बायको मुले, भाऊ-बहीण, आई-वडील, सगेसोयरे कोणीही अंतकाळी कामाला येत नाहीत. सर्वच मायामोहाचे भागीदार असतात. संत तुकाराम महाराजांनी पुढील काव्यातून स्पष्टच सांगितले आहे,

नको नको मना गुंतू माया जाळी,
काळ आला जवळी ग्रासावया।
काळाची हे उडी पडेल बा जेव्हा,
सोडविना तेव्हा मायबाप।
सोडविना बंधू पाठीची बहिन,
शेजेची कामिनी दूर राहे।
सोडविना राजा देशीचा चौधरी,
आणिक सोयरी भलीभली।
तुका म्हणे तुला सोडविना कोणी,
एका चक्रपाणी वाचूनिया।

(तु.गाथा.८७२)

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांनी सुंदर असे चिंतन केले आहे की, हे भल्या माणसा तुझा अंतकाळ आल्यावर तुला कोणीही सोडविणार नाहीत. मग आईबाप असो, पाठीची बहीण भाऊ असो किंवा शेजेची कामिनी असो. कारण पत्नी ही तर आयुष्यभर साथ करणारी असते, परंतु अंतकाळी ती पण बाजूलाच होते. तसेच खूप श्रीमंत सोयरी धायरी असतात शिवाय देशाचा राजा जरी असला तरी तो ही तुला सोडवू शकत नाही. परंतु जर परमार्थ केलाच तर मात्र ज्याने तुला या दुःखातून संसारात घातले आहे तोच त्याचे निवारण करील हे मात्र त्रिकालबाधीत सत्य आहे असे स्पष्ट शब्दांत तुकाराम महाराजांनी सांगितले आहे.

समर्थ सद्गुरु हरदेवसिंहजी महाराज आज वर्तमान युगात समस्त मानवजातीला हाच मोलाचा संदेश देतात की, हे भल्या माणसा तू संपूर्ण आयुष्यात संसारातील कार्यरत मग्न राहिलास. नाना प्रकारच्या सांसारिक गोष्टींना महत्व देऊन कवटाळीत बसलास, धनसंपत्ती जमा केलीस, स्वजनांच्या- आप्तेष्टांच्या मोहमायेत फसलास, अनेक पापकर्म करीत फिरलास तरी संसार हा दुःखमूळ आणि क्षणिक आहे. हे समजल्यावरही तू तुझे अनमोल जीवन व्यर्थ घालविलेस. संसार हा नश्वर आहे. परिवर्तनशील आहे. जे जे दृष्टीला पडते हे सारे क्षणार्धात निरर्थक ठरणारे आहे. नाश पावणारे आहे. तेव्हा अशा अशाश्वत क्षणिक दुःखमूळ संसारातून मुक्त होण्यासाठी परमपिता परमात्म्याला शरण ये. भक्तीरसाने तुझी जीवन नौका पैलतीराला गेल्याशिवाय राहणार नाही. ज्याला सत्य आत्मज्ञान प्राप्त होते तोच सर्वज्ञ असतो, तेव्हा मनुष्याने संसाराचा मोह सोडावा. कारण संसार हा दुःखमूळ आहे. त्याकरीता समयाच्या सद्गुरुला शरण

येऊन जीवनाचे कल्याण करावे. युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज पण अवतारवाणीत हीच समज देतात-

अरे नरा या जगती तुजला कोणी संगी साथी नसे।
जाती न संगे तुझीया कोणी जीव एकटा जात असे।
माय रडे तव धाई धाई बंधू तुज घेऊन जाती।
सूत दारा कन्याही रडून तुझ्या गुणांना आठविती।
शुभाशुभ कर्मे केली तिच तुझ्या संगे जाती।
म्हणे अवतार हरिवीण सारी जगताची खोटी नाती।

(अ.वा.पद क्र.५७२)

पवित्र अवतारवाणीतून युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज विश्वातील समस्त मानव जातीला सांगतात की, हे नरश्रेष्ठा तुझा अंतसमय आल्यावर तुला एकट्यालाच जावे लागते. त्यावेळी तुला कोणीही संगीसाथी नसणार आहेत. तुझा जीव एकटाच जात असतो आणि तुझे नश्वर शरीर तुझे बंधु भाऊबंध सगेसोयरे त्या नश्वराची विल्हेवाट लावत असतात. त्यावेळी मात्र तुझी आई माय धाय मोकलून रडत असते, मुले आणि मुली तुझ्या गुणांना आठवून आठवून धाय मोकलून रडते. परंतु बरोबर कोणीही येणार नाहीत. पण तू जे जे जीवनात गुण अवगुण केले आहे तेच तुझ्याबरोबर येणार. पण तू जर हरिला ओळखून त्याचे भजन केलेस तर मात्र हरि तुला सांभाळतील मात्र जी जी जगातील नाती गोती आहेत ती सर्व खोटी आहेत. म्हणूनच युगानयुगे संत महात्मे जगात आल्यावर मानवाने परमार्थ करुन मोक्षाचे धनी व्हावे हिच शिकवण आज वर्तमान समयाला घोर कलियुगात समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज समस्त मानवजातीला देत आहेत की; हे मानवा तुझे कल्याण त्या दुःखमूळ त्या संसारात नसून ते एक वेळ या हरिला शरण येऊन मोक्षाचा धनी हो आणि आपला इहलोक परलोक सुखी कर.

श्री. कोंडाजी भागवत निरंकारी
(अहमदनगर)

~~~~~~~~~~

तिसरा प्रण.....

(पान ३५ वरुन)

मंडळाबद्दल गैरसमज पसरु शकतो आणि प्रचार-प्रसारामध्ये बाधा येऊ शकते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी असे अन्न वर्जित करणे उचित होईल.

मांसाहार सेवन केल्यामुळे आपण धष्टपुष्ट होऊ असाही युक्तीवाद केला जातो. परंतु हत्तीसारखा बलशाली प्राणी केवळ पालापाचोळाच खातो. बदाम, शेंगदाणे, फळे, पालाभाज्या, दूध, दही, तूप असे शाकाहारानध्ये कितीतरी चांगले आणि पौष्टिक पदार्थ आहेत ज्याची तुलना कोणत्याही मांसाहाराशी होऊ शकत नाही. शिवाय सात्विक आहारामुळे मन देखील सात्विक बनते. तामस आहारामुळे मन तामस बनते. आपण जर बारकाईने निरीक्षण केले, तर तामस आहार सेवन करणाऱ्या व्यक्तींमध्ये गुन्हे करण्याची प्रवृत्ती अधिक प्रमाणात असलेली दिसून येते.

भरपूर जीवनसत्व असणारे शाकाहारी पदार्थ खूप महाग असून ते केवळ श्रीमंतांनाच परवडणारे असतात असा दोष गरीबांना-देवाला देता येणार नाही. बदामासारख्या महाग पदार्थांमध्ये असणारे जीवनसत्व शेंगदाण्यात आहे. संत्रे, गाजर, काकडी, बीट यासारखे कितीतरी स्वस्त व आरोग्यहितवर्धक पदार्थ आहेत की जे सर्वांना परवडणारे असतात.

भक्तश्रेष्ठ शबरी ही जातीनं भिल्ल होती. भिल्ल समाजातील राजाची ती कन्या होती. तिचा विवाह निश्चित झाला होता. जय्यत तयारी चालू होती. त्यांच्या पध्दतीप्रमाणे मांसाहारी अन्न करण्यासाठी शेकडो बकरे लग्नाच्या दिवशी कापले जाणार होते. आपल्या लग्नामुळे इतके प्राणी जीवाला मुकणार या कल्पनेने ती त्या रात्री घरातून अरण्यात पळून गेली. ती शेवटपर्यंत अविवाहीतच राहिली. ही घटना त्रेता युगातील. अल्पवयीन व अशिक्षित शबरीला पाप काय पुण्य काय हे त्यावेळी समजलं होतं. प्राप्त स्थितीत कोणतंही भोजन स्वीकारणं हे जसं आक्षेपार्ह नाही तसं परिस्थितीनुसार निर्णय घेणं हे आपल्या हातात आहे. शेवटी चांगलं-वाईट काय? शाकाहार बरा की मांसाहार? हा ज्याच्या त्याच्या इच्छेचा प्रश्न.

श्री. प्रवीण तुकाराम रेडेकर

~~~~~~~~~~

मन काबूत कसं ठेवायचं ?

मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर

माणसाचं मन हे माणसाला स्वस्थ स्थिर कधीच बसू देत नाही. मानवी मन हे काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार आणि द्वेषाचे जणू माहेरघरच आहे. मन हे पाण्यासारखं आहे. उंचावरुन सोडलं तर क्षणात जमिनीवर येऊन पोहचतं; पण तेच पाणी जर एखाद्या इमारतीवर चढवायचे असेल तर त्यासाठी मोटर किंवा इंजिनचा वापर करावा लागेल. तसा अगदी श्रेष्ठ दर्जाचा माणूस क्षणातच वाईट मार्गालाही जाऊ शकतो. म्हणूनच मानवी मनाला जर स्वच्छ, शुध्द, निर्मळ, पावन, पवित्र बनवायचे असेल तर सेवा, सत्संग, नामस्मरणाचा आधार घ्यावा लागेल.

एकदा एका राजानं राजदरबारामध्ये कीर्तनाचा कार्यक्रम ठेवला. कीर्तनाचा विषय होता 'मन'. कीर्तनकाराने दोन तास कीर्तन केलं आणि तो निघून गेला; पण राजाच्या काही लक्षात येईना, मन म्हणजे काय ? ते काबूत कसं ठेवायचं ? अनेक प्रश्न राजा समोर उभे राहिले आणि राजानं प्रधानाला प्रश्न केला की, प्रधानजी मनाला कसं काबूत ठेवता येईल ? प्रधान चतुर होता. त्यानं राजाला सांगितलं, महाराज मला पंधरा दिवसांचा अवधी द्या. राजानं त्याला मान्यता दिली. प्रधानानं दवंडी पिटवली आणि सर्व प्रजेला राज दरबारामध्ये बोलावण्यात आलं. राजगादीवर राजा विराजमान होता. राजवाडा प्रजाजनांनी भरला होता. प्रधान राजाला मुजरा करुन एका शेळीकडे हात दाखवत म्हणाला, 'या शेळीला पोटभर खाऊ घालून तिचे पोट जो कुणी भरुन दाखविल त्याला पाच मोहरा दिल्या जातील, पण एक अट आहे. शेळीनं राजवाड्यात आल्यानंतर मात्र कशालाच तोंड लावायचं नाही.'' एक मंत्री उठला आणि शेळीला घरी घेऊन गेला. त्यानं शेळीला पेंड, गवत खूप खाऊ घातलं. दुसऱ्या दिवशी शेळीला घेऊन राजदरबारात आला. शेळीचं पोट भरलेलं पाहून प्रत्येकाला वाटत होतं की, या पाच मोहरा मंत्र्यालाच मिळणार.

प्रधानाने राजाकडे गवताची पेंडी आणून दिली आणि मंत्र्याला सांगितले की, तुमच्या हातातली शेळी सोडून द्या. शेळीची जातच ती, कितीही खायला घातलं तरी खाल्ल्याशिवाय राहणार नाही. ती धावत राजाकडे गेली आणि गवत खायला सुरुवात केली. पराभव झालेल्या मंत्र्याने मान खाली घातली आणि आसनावर जाऊन बसले. रोज एकेक जण शेळीला घेऊन जायचा पण राजदरबारामध्ये प्रत्येकाचा पराभव व्हायचा. चौदा दिवस निघून गेले.राजा प्रधानाला म्हणले, चौदा दिवस गेले अजून तुला एका प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही. प्रधानाने सांगितले, महाराज मी पंधरा दिवसांचा अवधी मागितला आहे. पंधराव्या दिवशी प्रधान शेळीला घरी घेऊन गेला. घरी गेल्या नंतर त्याने आपल्या पत्नीला सांगितले की, तू गवताची पेंडी घेऊन बैस. हिरवंगार गवत हातामध्ये पाहून शेळी पळतच सुटली. जसजशी शेळी जवळ येऊ लागली तशी प्रधानाने शेळीच्या तोंडावर काठीचा फटका मारला. दोन तास प्रधान तिच्या तोंडावर फटके मारत राहिला. शेळीचे तोंड सुजले. दहा वाजण्याची वेळ होती. राजदरबार भरला. प्रधान माझ्या प्रश्नाचं उत्तर देणार म्हणून राजाही खूश होता. दरबाराचं लक्ष प्रधानाकडे लागलेलं होतं. तोच प्रधान शेळीला घेऊन आला. शेळीचं पोट खपाटीला गेलेलं होतं. प्रधानानं सांगितलं, महाराज गवताची पेंडी हातात धरा. प्रधानाने शिपायाला सांगितले, सोडा शेळीला. शिपायानं शेळी सोडली. हिरवेगार गवत आणि भुकेने व्याकूळ झालेली शेळी राजाकडे पळत सुटली. तोच प्रधानजीने काठी वर केली. शेळीच्या लक्षात आले, फटका तोंडावर बसणार आहे. रात्री झालेला प्रकार आता होऊ नये म्हणून शेळीनं तोंड मागे फिरवलं. राजाने चार वेळा शेळीच्या समोर गवत नेलं, पण शेळीनं त्याला तोंड लावलं नाही. प्रधान पैज जिंकला आणि पाच मोहरांचा तो धनी झाला. राजानं त्याला विचारलं, 'प्रधानजी, माझ्या प्रश्नाचं उत्तर तुम्ही दिलं नाही.'' तेव्हा प्रधानाने सांगितले , 'राजन! हेच आपल्या प्रश्नाचं उत्तर आहे. आपलं मन हे शेळी प्रमाणे आहे.''

मोहमायेची मनातली आसच कधी संपत नाही. त्याला कितीही दिलं तरी ते शांत बसत नाही. ते फार लालची आहे. त्याला जर शांत करायचं असेल, प्रभू नामात जर रंगवायचं असेल तर त्याला वेळोवेळी संत महापुरुषांच्या वचनांनी फटकारावं लागेल.

कु. स्वाती बाळासाहेब उमाप
मु.पो.पारनेर, जि. अ.नगर

वाचकांचे मनोगत !

आदरणीय संपादकजी,

धन निरंकार.

छान सुटसुटीत आणि मनमोहक असा *'मर्यादा विशेषांक'* प्रकाशित केल्याबद्दल संपादक मंडळाचे हार्दिक अभिनंदन आणि मनपूर्वक आभार! संपादक मंडळाचे मानावेत तेवढे आभार थोडेच. विशेषांकासाठी अतोनात परिश्रम घेतले असणार हे नुसतं अंक चाळता चाळताच जाणवतं. एकदम Sweet and Simple. संपादक मंडळ सदस्यांचा सर्वच विभागांमध्ये सक्रिय सहभाग दिसतोय. मंडळाच्या सेवाकार्यातून वेळ काढून स्वतःच्या साहित्यकृतींवर कार्य करुन त्या up to the mark घडवल्याबद्दल त्यांचं पुन्हा एकदा मनःपूर्वक कौतुक आणि अभिनंदन....अजुन एका यशस्वी अंकाबद्दल!

श्री. नयन गंगाराम कावणकर (कुंभारवाडा, मुंबई)

~~~~~~~~~~

डिसेंबर २०११चा मराठी संत निरंकारी मासिकाचा अंक खूपच आवडला. श्री. प्रविण रेडेकर लिखित लेख फारच सुंदर वाटला. त्यांनी केरळचा आध्यात्मिक प्रवास फारच सुंदरतेने वाचकांसमोर ठेवला. त्याचप्रमाणे प्रेमाला भाषेचे बंधन नसते हे प्रकर्षाने जाणवले. भाषा कोणतीही असो, पण प्रेमाची भाषा हीच खरी भाषा आहे. मासिकातील सर्वच लेख फारच सुंदर आणि वाचनीय होते.

श्री. प्रकाश काशिराम चव्हाण (शिवडी, मुंबई)

~~~~~~~~~~

जानेवारी २०१२चा संत निरंकारी (मराठी) मासिकाचा अंक पाहून आनंद द्विगुणित झाला. मुखपृष्ठावरील सद्गुरु बाबाजींचे छायाचित्र म्हणजे निराकाराच्या साकार स्वरुपाचे प्रत्यक्ष दर्शन. या मासिकात महाराष्ट्र संत समागमचा ४५ वर्षांचा इतिहास (महाराष्ट्र संत समागमची मांदियाळी) प्रकाशित केलेला पाहून अत्यानंद झाला, कारण महाराष्ट्राच्या पहिल्या समागमपासून ते ४५व्या समागमपर्यंतच्या तारखा आणि समागमची ठिकाणं प्रसिध्द करण्यात आल्याने आमच्या माहिती संग्रहात खूप मोलाची भर पडली आणि अशी माहिती संकलित करणाऱ्याचं अगदी मनःपूर्वक अभिनंदन! दिवसेंदिवस उन्नतीच्या दिशेने वाटचाल करणारे संत निरंकारी (मराठी) मासिक जनमाणसापर्यंत पोहचून सर्वांना अनमोल ब्रह्मज्ञानाचा खजिना प्राप्त होवो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना!

श्री. शशिकांत मधुकर शिसवे

आपटी, कल्याण, जि. ठाणे

~~~~~~~~~~

४५व्या महाराष्ट्र संत समागम निमित्त जानेवारी २०१२चा संत निरंकारी (मराठी) मासिकाचा अंक अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडणारा होता. मासिकाचे एक-एक पान म्हणजे ज्ञानामृताचा वर्षाव आणि तोसुध्दा आकर्षक अशा निरनिराळ्या रंगात! एकेक लेख म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचे सोनेरी पान. मर्यादेच्या स्वाधीनतेत जीवनाचा आनंद, प्रभू परमात्मा दूर नाही अगदी जवळ, विवेक विचारधारेचा अनमोल खजिना हे तत्वज्ञानावर आधारित लेख आध्यात्मिक जीवन जगण्यास उपयुक्त तर आहेतच शिवाय महाराष्ट्र संत समागम मंदियाळी, मुंबई महानगरीची प्रबंधकीय व्यवस्था व मुंबई झोन सेवादल क्षेत्र इत्यादी अत्यंत महत्वपूर्ण आणि उपयुक्त माहितीचा खजिना प्रसिध्द केल्याबद्दल अभिनंदन.... पुन्हा पुन्हा अभिनंदन!

सौ. श्रध्दा कोपरकर (मुंबई)

~~~~~~~~~~

चंद्रपूरात (महाराष्ट्र) संत निरंकारी सत्संग भवनचे उद्घाटन करताना सद्गुरु बाबाजी

करीम नगरमध्ये (आंध्र प्रदेश) आयोजित सत्संग समारोहात मंचावर विराजमान सद्गुरु बाबाजी आणि पुज्य माताजी

संत निरंकारी मंडळाच्या चंदिगडमध्ये आयोजित सेमिनारचे दीप प्रज्ज्वलित करुन शुभारंभ करत असताना सन्माननीय अतिथी आणि प्रबंधकगण

Printed Matter
RNI No.59874/93
Postal Regd No.MH/MR/EAST/91/2012-2014
Publishing date 27th of every previous month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 27th of every previous month

होळीच्या शुभ प्रसंगी संत निरंकारी कॉलनी दिल्लीमध्ये आयोजित सत्संगामध्ये मंचावर विराजमान सद्गुरु बाबाजी व मातृशक्ति

दिल्लीमध्ये गुरुपूजा दिवसाच्या प्रसंगी आयोजित सेवादल रॅलीत प्रस्तुती देताना सेवादलचे भाऊ-बहिणी

दुर्ग (भिलाई) मध्ये आयोजित मध्यप्रदेश - छत्तीसगडच्या प्रांतीक संत समागमात उपस्थित विशाल मानव परिवार